- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
- २४ कॅरेट : १,४८,७०० /-
- २३ कॅरेट : १,४६,३५० /-
- चांदी : २,३८,३००/-

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार
संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

विदर्भातील सर्व जिल्ह्यामध्ये प्रतिनिधी नेमणे आहे...
विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये शहर, ग्रामिण भागात प्रतिनिधी नेमणे आहे. अनुभवी व इच्छुक असलेल्यांनी संपर्क साधावा...
- दैनिक सिंहवाणी वृत्त -
९६५७२३२०२६, ८६९८७८८६६६

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : सोमवार, २० जुलै २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २२१ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# केंद्र सरकारकडून लोकशाहीची हत्या

## सोनम वांगचुक यांना दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतल्या प्रकरणी नाना पटोले यांचा संताप

**वृत्तसंस्था, मुंबई**

लडाखचे आंदोलक सोनम वांगचुक यांना दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतल्याच्या घटनेचा तीव्र निषेध करत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी केंद्र सरकारवर हल्लाबोल केला. शांततापूर्ण मार्गाने आमरण उपोषण करणाऱ्यांवर आत्महत्येचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करून थेट तुरुंगात डांबण्याचा नवा कायदा केंद्र सरकारने आणला आहे. दिल्ली पोलिसांनी ज्या हुकूमशाही पद्धतीने आंदोलकांना वागवले, ती थेट लोकशाहीची हत्या आहे, असे नाना पटोले म्हणाले.



सध्याच्या नीट परीक्षेतील कथित भ्रष्टाचारावर बोलताना नाना पटोले यांनी केंद्रीय शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा मागितला आहे. नीट परीक्षेत ज्यांनी कोट्यवधींचा घोटाळा केला, त्यांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे. आता तर थेट गुणपत्रकांमध्येच (मार्कशीट) फेरफार झाल्याचे मोठे घोटाळे समोर येत आहेत. अशा संस्थांवर आता थेट लष्कर (मिल्ट्री) तैनात करण्याची गरज निर्माण झाली आहे, असे पटोले म्हणाले. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याविरोधात निघणाऱ्या काँग्रेसच्या आगामी मोर्चात आपण स्वतः सहभागी होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पुढे बोलताना पटोले म्हणाले, मोदी सरकारने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची शांतता आणि सत्याग्रहाची तत्त्वे देशातून पूर्णपणे मोडीत काढली असून, जनतेमध्ये आता या दडपशाहीविरोधात तीव्र असंतोष निर्माण होऊ लागला आहे.

**विधानसभा अध्यक्षांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह**

तसेच, महाराष्ट्रातील राजकीय पक्षफुटीवर भाष्य करताना त्यांनी विधानसभा अध्यक्षांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जेव्हा फूट पाडण्यात आली, तेव्हाच जर घटनेच्या तिसऱ्या अनुसूचीनुसार बंडखोरांवर कठोर कारवाई झाली असती, तर आज कोणाचेही असे वागण्याचे धाडस झाले नसते. केंद्रातील सत्ताधाऱ्यांनी पाशवी बहुमताच्या जोरावर नियमांना बगल देऊन अपात्र खासदारांनाही सरळ मान्यता दिली, असा थेट आरोप त्यांनी केला.

**महायुती सरकार शेतकरीविरोधी**

राज्यातील महायुती सरकारला शेतकरीविरोधी संबोधत नाना पटोले यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या घोषणांची जोरदार खिल्ली उडवली. मुख्यमंत्र्यांनी कृषीपंपांचे वीजबिल माफ करण्याची



घोषणा केली आणि सभेत टाळ्या वाजवून घेतल्या. परंतु, हे सरकार अत्यंत बनवाबनवी करणारे आहे. सर्वसामान्यांच्या खिशातून आधी एक रुपया लुटायचा आणि नंतर जाहीरपणे त्यांना चार आणे देऊन उपकाराची भाषा करायची, असा हा प्रकार आहे. भाजप केवळ बळिराजाची चेष्टा करत असून, त्यांना शेतकऱ्यांच्या सुख-दुःखाशी काहीही देणेघेणे नाही, असे ते म्हणाले.

**अण्णा हजारेंच्या शांततेवर उपरोधिक टोला**

अण्णा हजारे आता वयोवृद्ध झाले आहेत, त्यामुळे त्यांच्यावर जास्त बोलणे योग्य नाही. मात्र, कधीकाळी ज्यांना देशाचे महात्मा गांधी म्हणून संपूर्ण देशात संबोधले जायचे, ते अण्णा आज देशात आणि राज्यात सुरू असलेल्या एवढ्या मोठ्या भ्रष्टाचाराच्या विरोधात चकार शब्दही काढत नाहीत, ते पूर्णपणे शांत बसले आहेत, असा टोला त्यांनी लगावला.

**माझे राजकीय गुरू विलासराव देशमुख**

राजकारणात प्रत्येकाचा एक विशिष्ट काळ असतो. माझे राजकीय गुरू विलासराव देशमुख नेहमी एक गोष्ट सांगायचे की, वेळेच्या आधी आणि नशिबापेक्षा जास्त कोणालाही काहीच मिळत नाही, अशा सूचक शब्दांत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सध्याच्या राजकीय घडामोडींवर भाष्य केले आहे.

### सफदरजंग सरकारी रुग्णालयावर विश्वास नाही : पत्नी गीतांजली

दिल्लीतील सफदरजंग रुग्णालयात दाखल असलेल्या सोनम वांगचुक यांना पत्नी गीतांजली यांनी खासगी रुग्णालयात हलवण्याची मागणी केली आहे. पत्नी गीतांजली आंगमो यांनी दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. आंगमो म्हणतात की, त्यांचा आता सफदरजंग रुग्णालयावर विश्वास राहिलेला नाही. "ही एक बेकायदेशीर अटक झाली आहे," असे त्या म्हणाल्या. दिल्ली पोलिसांनी शनिवारी सकाळी वांगचुक यांना जंतर मंतरवरून ताब्यात घेऊन सफदरजंग रुग्णालयात नेले. रुग्णालयातही वांगचुक यांचे उपोषण सुरूच आहे. आज (१९ जुलै) त्यांच्या उपोषणाचा २२ वा दिवस आहे. त्यांनी सलाईन, ओआरएस किंवा इतर औषधे घेण्यास नकार दिला आहे.



गीतांजली आंगमो यांनी ट्विट करत म्हटले आहे की, रुग्णालयाने आम्हाला सांगितले होते की, सोनम वांगचुक यांच्या शरीरातील पोटॅशियमची पातळी २.९ पर्यंत खाली घसरली आहे, जी चिंताजनक आणि जीवघेणी आहे. मात्र, रुग्णालयाने त्यांच्या जाहीर आरोग्य पत्रकात हा आकडा मुद्दाम लपवून ठेवला आणि फक्त "पोटॅशियमची पातळी कमी होत आहे" असा मोघम उल्लेख केला. तब्बल १० तास आणि वारंवार विनंत्या केल्यानंतर, शेवटी रात्री १०.३० वाजता त्यांनी आम्हाला रक्ताचे नमुने घेण्याची परवानगी दिली.

थोडक्यात

### रवींद्र धंगेकरांना अटक होणार?



**पुणे** : पुण्यातील बांधकाम व्यावसायिक खलील शेख यांच्या मृत्यूप्रकरणात माजी आमदार तथा शिंदे गटाचे नेते रवींद्र धंगेकर यांच्या अडचणी वाढल्या आहेत. या प्रकरणात त्यांच्यासह पत्नी प्रतिभा धंगेकर आणि इतर काही जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, अटकेची शक्यता निर्माण झाल्याने दोघेही सध्या संपर्काबाहेर असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, पोलिसांनी त्यांचा शोध घेण्यासाठी विविध पथके रवाना केली आहेत. खलील शेख यांच्या मृत्यूस जबाबदार असल्याचा आरोप रवींद्र धंगेकर, प्रतिभा धंगेकर आणि अन्य व्यक्तींवर करण्यात आला आहे. या आरोपांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी गुन्हा नोंदविल्यानंतर कारवाईची शक्यता वाढली आहे. अटक टाळण्यासाठी धंगेकर दाम्पत्याने न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केला असून, या अर्जावर सोमवारी सुनावणी होणार आहे. दरम्यान, पोलिस कारवाईपूर्वी दोघांनीही आपले मोबाईल फोन बंद ठेवले असून ते नॉट रिचेबल असल्याचे समोर आले आहे. त्यांचा ठावठिकाणा शोधण्यासाठी पुणे पोलिसांची अनेक पथके वेगवेगळ्या ठिकाणी रवाना करण्यात आली आहेत. अटकपूर्व जामिनावर निर्णय होण्यापूर्वी पोलिसांच्या ताब्यात जाऊ नये, यासाठी त्यांनी अज्ञातस्थळी मुक्काम केल्याची माहिती समोर येत आहे.

# शेतकऱ्यांची साडेपाच कोटींची फसवणूक करून व्यापारी फरार

**वृत्तसंस्था, पूर्णा**

तालुक्यातील एरंडेश्वर येथे शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करून तब्बल १०० ते १५० शेतकऱ्यांचे सुमारे ६ हजार ८०० क्विंटल शेतमाल घेऊन व्यापारी मुलांसह फरार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणात शेतकऱ्यांची सुमारे साडेपाच कोटींची फसवणूक झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी दि. १७ जुलै पूर्णा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पूर्णा तालुक्यातील एरंडेश्वर हे शेती प्रधान गाव आहे. येथे वास्तव्यास असलेले शेख हमीद शेख बालेसाब व त्यांचा मुलगा शेख सरू शेख बालेसाब यांनी सुरुवातीला शेतकऱ्यांकडून नियमितपणे शेतमाल खरेदी करून वेळेवर पैसे दिले. त्यामुळे परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी त्यांच्यावर विश्वास ठेवून मोठ्या प्रमाणात शेतमाल विक्री केली.

मात्र, मागील काही महिन्यांत संबंधित व्यापाऱ्यांनी १ हजार ९६ क्विंटल हळद, ३ हजार ६३० क्विंटल सोयाबीन, २ हजार ००० क्विंटल हरभरा, ५७ क्विंटल गहू आणि ३५ क्विंटल तूर असा एकूण सुमारे ६ हजार ८०० क्विंटल शेतमाल खरेदी केला. या मालाची उचल केल्यानंतर लवकरच पैसे देण्याची वारंवार आश्वासने देण्यात आली. मात्र प्रत्यक्षात पैसे देण्यात आले नाहीत. काही दिवसांनंतर व्यापारी आपल्या मुलासह गावातून निघून गेल्याचे कळल्यानंतर शेतकऱ्यांना फसवणूक झाल्याची जाणीव झाली. त्यानंतर संतप्त शेतकऱ्यांनी पूर्णा पोलीस ठाण्यात धाव घेत प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी सिंगणवाड यांच्याकडे सामूहिक तक्रार दाखल केली आहे.

प्राथमिक माहितीनुसार या प्रकरणात शेकडो शेतकरी आर्थिक फसवणुकीचे बळी ठरले आहेत. लंपास झालेल्या शेतमालाची बाजारभावानुसार किंमत सुमारे साडेपाच कोटी रुपये असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. पोलिसांनी तक्रारीची दखल घेत संबंधित व्यापाऱ्याविरूध्द गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे. या घटनेमुळे एरंडेश्वरसह संपूर्ण परिसरात संतापाचे वातावरण आहे. संबंधित व्यापाऱ्याला तातडीने अटक करून शेतकऱ्यांचे पैसे वसूल करावेत अशी जोरदार मागणी होत आहे.

# जम्मूतील पूंछ आणि किश्तवारमध्ये ढगफुटीचा थरकाप, ८ जणांचा मृत्यू

## सहा बेपत्ता, २५० वाहने वाहून गेली, केदारनाथ मार्गावर भूस्खलन, १४ राज्यांमध्ये अलर्ट

**वृत्तसंस्था, जम्मू**

जम्मू आणि काश्मीरच्या राजौरी जिल्ह्यात शनिवारी रात्री ३ वाजता झालेल्या मुसळधार पावसामुळे अचानक पूर आला. धरहल नदीला पूर आल्याने न्यू बस स्टँड बेला परिसरात पाणी शिरले. सुमारे २०० ते २५० वाहने वाहून गेली. दरम्यान, पूंछमध्ये रात्रभर झालेल्या मुसळधार पावसामुळे आठ जणांचा मृत्यू झाला असून सहा जण अद्याप बेपत्ता आहेत.



किश्तवार जिल्ह्यातील दच्छनच्या सुरनू भागात ढगफुटीमुळे घरे आणि शेतजमिनीचे नुकसान झाले. देशात दुसऱ्यांदा मान्सून सक्रिय झाल्याने दिल्ली, पंजाब, हरियाणा, जम्मू आणि काश्मीर, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, सिक्कीम, आसाम, मेघालय आणि अरुणाचल प्रदेशमध्ये मुसळधार पाऊस सुरू आहे. रविवारीही उत्तराखंड, सिक्कीम आणि बंगालसाठी मुसळधार पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**केदारनाथ मार्गावर भूस्खलन**

शनिवारी उत्तराखंडमध्ये झालेल्या भूस्खलनानंतर, केदारनाथ यात्रा मार्गावर घोड्यांनी ओढलेल्या खेचरांची सेवा स्थगित करण्यात आली असून, कैलास-मानसरोवर यात्रेकरूंचा एक गटही अडकून पडला आहे. अरुणाचल प्रदेशात पूर आणि भूस्खलनाच्या या लाटेत आतापर्यंत सात जणांचा मृत्यू झाला असून, २९ जण जखमी झाले आहेत आणि १,४९,२५७ जण प्रभावित झाले आहेत. मान्सूनमुळे एकूण २६ जिल्हे, ३२८ मंडळे आणि ५७६ गावांना फटका बसला आहे. दरम्यान, पिथोरागडमध्ये, कैलास-मानसरोवर यात्रेची ५० यात्रेकरूंची चौथी तुकडी धारचुला बेस कॅम्पवर थांबवण्यात आली आहे. बेस कॅम्पचे प्रभारी धन सिंग बिष्ट यांनी सांगितले की, गरबधारमध्ये भूस्खलन झाल्यामुळे गुंजीकडे जाणारा रस्ता बंद झाला आहे.

# आत्महत्येपूर्वी शिक्षकानेच केली दोन्ही मुलांची हत्या

## शवविच्छेदन अहवालातून धक्कादायक सत्य उघड

**दै. सिंहवाणी वृत्त, नांदेड**

जिल्हा परिषद शाळेतील एका शिक्षकाने आपल्या दोन मुलांसह कार गोदावरी नदीत टाकून आत्महत्या केली होती. मात्र शिक्षक आणि दोन मुलांच्या मृत्यू प्रकरणाला शवविच्छेदन अहवालानंतर धक्कादायक वळण मिळाले आहे. आत्महत्येपूर्वी शिक्षक पित्यानेच दोन्ही मुलांची धारदार चाकुने हत्या केल्याची सत्यता उघड झाली आहे.

नांदेड जिल्ह्यातील हिमायतनगर तालुक्यातील पोटा येथील जिल्हा परिषद शाळेत कार्यरत असलेल्या ४२ वर्षीय सुनील मोरे या शिक्षकाने शुक्रवारी १६ जुलै रोजी सकाळी आपल्या दोन मुलांसह आत्महत्या केली होती. नांदेड - मुदखेड मार्गावरील आमदूरा पुलावरून भरधाव वेगाने त्याने गोदावरी नदीत गाडी घातली होती. या गाडीत त्याची १४ वर्षीय मुलगी सारा आणि १० वर्षीय मुलगा सुमेध हे दोघे सोबत होते.

आत्महत्येपुर्वी या शिक्षकाने गट शिक्षणाधिकारी किशन फोले, विस्तार अधिकारी सूर्यकांत बाचे, केंद्रप्रमुख शिवाजी कदम व सहकारी शिक्षक दत्ता पवळे यांच्या त्रासाला कंटाळून मुलांसह आत्महत्या करत असल्याच स्टेटस त्याने व्हाट्सअप वर ठेवले होते. शिवाय तसा एक मॅसेज देखील मयत सुनील मोरे याने मित्रांच्या ग्रुपवर टाकला होता. मयत सुनील मोरे याच्या मृत्यू प्रकरणी वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून नांदेड ग्रामीण पोलिसांनी चार जणांवर अँट्रॉसिटी आणि मृत्यूस कारणीभूत असल्याचा गुन्हा उपरोक्त चौघांवर दाखल केला. दरम्यान आपल्या दोन्ही मुलांसह त्याने गाडी नदीत घातली अस प्रथमदर्शनी वाटत होती.



मात्र या निर्दयी पित्याने गाडी नदीत घालण्यापूर्वीच मुलगी सारा आणि मुलगा सुमेध यांच्या छातीवर, पोटात चाकुने वार करून त्यांची हत्या केली. यानंतर दोन्ही मुलांच्या मृतदेहासह गाडी नदीत घालुन आपलेही जीवन संपवले. तिघांचे मृतदेह काढून शनिवारी शवविच्छेदन करण्यात आले. दरम्यान पोलिसांना शवविच्छेदनाचा हा अहवाल प्राप्त झाला असून त्यात दोन्ही मुलांची हत्या करण्यात आल्याचे स्पष्ट झाले. हे धक्कादायक सत्य उघड होताच पोलिसांनी स्वतः फिर्याद देऊन मयत सुनील मोरे याच्या विरोधात खुनाचा गुन्हा दाखल केला आहे, अशी माहिती इतवारा विभागाचे पोलिस उपाधीक्षक प्रशांत शिंदे यांनी दिली आहे.

# बुलडाणा हादरले! विवाहितेवर सामूहिक बलात्कार

**दै. सिंहवाणी वृत्त, बुलडाणा**

बुलडाण्यामध्ये विवाहित महिलेवर सामूहिक बलात्कार करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. मध्यरात्री दोन जण घरात घुसले. आरोपींनी विळ्याचा धाक दाखवत पीडितेवर तिच्या नवऱ्यासमोरच आळीपाळीने बलात्कार केला. या घटनेनंतर आरोपी फरार झाले. या घटनेमुळे बुलडाणा हादरले. या प्रकरणी २ अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस सध्या फरार आरोपींचा शोध घेत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, बुलडाणा जिल्ह्याच्या मलकापूर तालुक्यातील एका गावात ही घटना घडली. धारदार शस्त्रांचा धाक दाखवून १९ वर्षीय विवाहितेवर दोघांनी सामूहिक बलात्कार केला. या प्रकरणी मलकापूर ग्रामीण पोलिस ठाण्यात दोन अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींच्या शोधासाठी पोलिसांनी पाच विशेष पथके नियुक्त केली आहेत. मध्यरात्रीच्या सुमारास घरात घुसून आरोपींनी हे भयंकर कृत्य केले.



पीडित महिला आणि तिचा नवरा एका शेतात कामासाठी वास्तव्यास असून तेथे मजुरीचे काम करतात. रात्री दोघेही घरात असताना दोन अज्ञात व्यक्तींनी दरवाजा तोडून घरात जबरदस्तीने प्रवेश केला. त्यापैकी एकाच्या हातात चाकू, तर दुसऱ्याच्या हातात विळा होता. शस्त्रांचा धाक दाखवत आरोपींनी मोबाईल फोन आणि रोख रक्कम हिसकावून घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यानंतर आरोपींनी नवरा-बायकोला घराबाहेर शेतात ओढत नेले. तेथे महिलेच्या नवऱ्याला रोखून धरत दोघांनी महिलेवर सामूहिक बलात्कार केला. घटनेनंतर आरोपींनी दुचाकीवरून पळ काढला. पीडितेच्या तक्रारीवरून मलकापूर ग्रामीण पोलिसांनी विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे.

संपादकीय लेखणीतून...

# मोडी लिपी: मराठी भाषेचे मूळरूप

मोडी लिपी ही मराठी भाषा लिहिण्यासाठी वापरली जाणारी लिपी आहे, जी महाराष्ट्र राज्यात बोलली जाणारी प्राथमिक भाषा आहे. तिच्या उत्पत्तीसंदर्भात अनेक सिद्धांत आहेत. २१व्या शतकातील मराठी लोकांचे असे विचार व मत आले आहे, की जर मराठी भाषेचे मूळ असलेली मोडी लिपी जर पुन्हा वापरात आणली गेली तर मराठी भाषेचा प्रभाव वाढेल. पण या विषयावर आजपर्यंत महाराष्ट्र शासनाने कोणतेही पाऊल उचलले नाही. भविष्यकाळात या विषयावर ठोस पाऊले उचलले जाईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. मोडी लिपी हात न उचलता लिहिली जाते, त्यामुळे वेगाने लिहिणे सोपे जाते. यात अनेक शब्दांची लघुरुपे वापरून कमीतकमी ओळीत सारांश लिहिला जातो. यातली अक्षरांची वळणे गोलाकार असतात, त्यांमध्ये देवनागरीच्या विपरीत काना खालून वर जातो. यामुळे पुढचे अक्षर चटकन लिहिता येते. तसेच प्रत्येक अक्षराची सुरुवात आणि शेवट डोक्यावरच्या रेषेवर होते. मोडी लिपीत चिटणीसी, महादजीपंती, बिवलकरी, रानडी अशी वळणे प्रसिद्ध आहेत. पुढे घोसदार वळण येऊन त्याचा भारतातल्या इतर भागातही प्रसार झाला असे मानले जाते. असंख्य मराठी ऐतिहासिक कागदपत्रे मोडी लिपीत असून इतिहास संशोधनाकरिता मोडी जाणकारांची कमतरता भासते. मोडी लिपी ही मराठी भाषा लिहिण्यासाठी वापरली जाणारी लिपी आहे, जी महाराष्ट्र राज्यात बोलली जाणारी प्राथमिक भाषा आहे. तिच्या उत्पत्ती संदर्भात अनेक सिद्धांत आहेत. २१व्या शतकातील मराठी लोकांचे असे विचार व मत आले आहे, की जर मराठी भाषेचे मूळ असलेली मोडी लिपी जर पुन्हा वापरात आणली गेली तर मराठी भाषेचा प्रभाव वाढेल. पण या विषयावर आजपर्यंत महाराष्ट्र शासनाने कोणतेही पाऊल उचलले नाही. भविष्यकाळात या विषयावर ठोस पाऊले उचलले जाईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

मोडी लिपीत एक पत्र सवाई माधवराव पेशवे यांनी सेनापती महादजी शिंदे यांस दि.३०-१२-१७८४ रोजी लिहिले होते. मोडी लिपीच्या उगमाबद्दल अनेक मते व मतभेद आहेत. इतिहासाचार्य वि.का.राजवाडे व डॉ.भांडारकरांच्या मते हेमाडपंताने ही लिपी श्रीलंकेतून आणली. परंतु चांदोरकरांच्या मते ती अशोककालातील मौर्यी- ब्राह्मीचाच एक प्रगत प्रकार आहे. वाकणकर व वालावलकरांच्या मते मोडी लिपी ही ब्राह्मी लिपीचाच एक प्रकार असून हात न उचलता लिहिण्याच्या तिच्या वैशिष्ट्यामुळे इतर लिपींपेक्षा वेगळी झाली आहे. ती श्रीलंकेतून आणली गेली असावी अथवा मौर्यी लिपीवरून विकसित झाली असावी, हे म्हणणे त्यांना मान्य नाही. ही लिपी महाराष्ट्रात कमीत कमी ९०० वर्षे वापरात आहे. सर्वांत जुना उपलब्ध मोडी लेख इ.स.११८९ मधील आहे. ते पत्र पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाच्या संग्रहात आहे. ती अल्पप्रमाणात का होईना सन १९५०पर्यंत लिखाणात प्रचलित होती. शेवटच्या २-३ शतकात या लिपीत अनेक फेरबदल झालेले आहेत. साधारण इ.स.१७००च्या सुमारास चिटणिसी आणि वळणे ही पूर्णपणे प्रगत झाली. यानंतर त्यात फारसे बदल दिसून येत नाहीत. ऐतिहासिक कागदपत्रांतील ही लिपी क्लिष्ट आणि वाचण्यास कठीण असते. ती पेशवाईकाळात अत्यंत उत्कर्षावस्थेत होती, असे मानले जाते. पेशवे यांच्या दप्तरातील कागदपत्रे, दस्ताऐवज पाहिले असता त्या उत्कर्षाची कल्पना येते. सुबक अक्षर, दोन ओळीतील समान अंतर, काटेकोर शुद्धलेखन हे या लेखनाचे वैशिष्ट्य आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा काळ ते उत्तर पेशवाई या काळांतील मोडीवाचनातून मराठी भाषेतील स्थित्यंतरे लक्षात येतात व मराठी भाषेचा प्रवास अभ्यासता येतो. इतिहासाचार्य राजवाडे यांच्या मताप्रमाणे ज्ञानेश्वरी लिहिली जाण्याच्या काळात मोडी संकल्पना महाराष्ट्रात येत होती. याच काळात पहिले मुस्लिम आक्रमण भारतात होत होते. लिखाणाकरिता कागदाचा वापर हा मुस्लिमांनी भारतात सुरू केला असावा, कारण कागज हा फार्सी शब्द असून या अर्थाचा संस्कृत शब्द अस्तित्वात नाही. इतिहासाचार्य राजवाडे ज्ञानेश्वरीतील ओव्यांचा हवाला देतात. देवनागरी अक्षरे आडव्या, उभ्या आणि टोकदार रेषांचा अवलंब करतात, त्यामुळे लिखाणाच्या हस्तलिखित प्रति बनवताना वेग कमी होतो. तर शिकस्तप्रमाणे गोलाकार व एकमेकांना जोडली जाणारी वळणे वापरून मोडी हस्तलिखिताचा वेळ वाचवत होती. विराम चिन्हांचा वापर इंग्रजी भाषाशी ओळख झाल्यानंतरच भारतीय लिपींत सुरू झाला.

भारतीय टपाल सेवेच्या माय स्टँप योजने अंतर्गत मोडी लिपी राखण्यास एक प्रयत्न केला आहे. चित्रात मराठी हे मोडी लिपीमध्ये छापले गेले आहे. ती १३व्या शतकापासून २०व्या शतकाच्या मध्यापर्यंत मराठी भाषेच्या लेखनाची प्रमुख लिपी होती. महादेव यादव व रामदेव यादव यांच्या राज्यकालात- १२६०-१३०९मध्ये हेमाडपंत- खरे नांव हेमाद्रि पंडित या प्रधानाने मोडी लिपीचा विकास केला. छपाईस अवघड असल्यामुळे मोडी लिपीचा वापर मागे पडला आणि बाळबोध-देवनागरी लिपीचा वापर सार्वत्रिक सुरू झाला. हा वापर सक्तीने करण्याची सुरुवात ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांनी केली.

# श्री विठ्ठल मूर्तीशास्त्र: ऐतिहासिक, पुरातत्वीय, वाङ्मयीन आणि तात्विक अभ्यास ॥

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

पंढरपूरच्या श्री विठ्ठलाची मूर्ती म्हणजे ऐश्वर्य आणि वैराग्य, शिव आणि विष्णू, तसेच देव आणि भक्त यांच्यातील अद्वैताचा एकतेचा अद्भूत संगम आहे. भौगोलिक आणि ऐतिहासिक दृष्ट्या ही मूर्ती महाराष्ट्राच्या मातीची आणि संस्कृतीची जिवंत साक्ष आहे. राजांच्या आणि पुजाऱ्यांच्या प्रयत्नांमुळे तिला मंदिराचे वैभव मिळाले असले, तरी तिला ख?्या अर्थाने जनसामान्यांच्या आणि उपेक्षितांच्या हृदयात सर्वोच्च स्थानी बसवण्याचे कार्य ज्ञानोबा-तुकोबांच्या संत चळवळीने केले. म्हणूनच आजही विठ्ठलाच्या मूर्तीकडे पाहिल्यावर कोट्यवधी वारकऱ्यांना आत्मिक शांतता लाभते.

महाराष्ट्र आणि दख्खनच्या पठारावरील सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक क्रांतीचे मुख्य ऊर्जेचे केंद्र म्हणजे पंढरपूरचा पांडुरंग. भारतीय उपखंडात अनेक प्राचीन आणि भव्य मंदिरे आहेत; जिथे देवता हातात विविध शस्त्रे घेऊन, सिंहासनाधिष्ठित किंवा दुष्टांचे निर्दालन करणाऱ्या आक्रमक मुद्रेत दिसतात. या पार्श्वभूमीवर, पंढरीचा विठुराया एका साध्या विटेवर, दोन्ही हात कमरेवर ठेवून, शस्त्रहीन आणि अत्यंत शांत, मंदस्मित मुद्रेत उभा आहे. हे रूप 'ऐश्वर्य' बाजूला ठेवून भक्तासाठी 'वात्सल्य' धारण करणाऱ्या माऊलीचे आहे. विठ्ठल मूर्तीचे पुरातत्वीय मूळ, अवयववार मूतीर्शास्त्रीय विश्लेषण, ऐतिहासिक शिलालेख, मूर्तीचे विस्थापन आणि तिचे सामाजिक-तात्विक आध्यात्मिक महत्त्व सर्वज्ञात आहे.

### १. ऐतिहासिक कालनिश्चिती आणि कोरीव पुरावे:

विठ्ठल आणि पंढरपूरचा इतिहास केवळ मौखिक आख्यायिकांवर अवलंबून नसून, त्याला भक्कम कोरीव आणि लिखित ऐतिहासिक पुरावे उपलब्ध आहेत. इतिहास संशोधक, अभ्यासक ग. ह. खरे, डॉ. रा. चिं. ढेरे, आणि प्रा. शं. गो. तुळपुळे यांनी शोधलेल्या प्रमुख पुराव्याप्रमाणे, आदि शंकराचार्यांचे 'पांडुरंगाष्टकम्' (इ.स. ८ वे शतक):

आदि शंकराचार्यांनी पंढरपूरला भेट दिली तेव्हा त्यांनी विठ्ठलाचे वर्णन करताना लिहिले आहे,

'महायोगपीठे तटे भीमरथ्या वरं पुण्डरीकाय दातुं मुनीन्द्रैः।'

या श्लोकावरून हे सिद्ध होते की, इसवी सनाच्या ८ व्या शतकापूर्वी म्हणजेच साधारण ६ व्या ते ७ व्या शतकात भीमा म्हणजे चंद्रभागा नदीच्या काठावर विठ्ठलाचे स्थान एक प्रसिद्ध 'महायोगपीठ' म्हणून प्रस्थापित झाले होते.

**तळघरातील शिलाहार कालीन शिलालेख (इ.स. ११८९):**

हा शिलालेख मंदिराच्या उत्खननात सापडलेला सर्वात जुना मानला जातो, ज्यामध्ये 'पांडुरंगपूर' आणि 'विठ्ठलदेव' असा स्पष्ट उल्लेख असून देवाच्या पूजेसाठी दिलेल्या भूमीदानाचा संदर्भ आहे.

**होयसळ राजा वीर सोमेश्वर याचा शिलालेख (इ.स. १२३७):**

कर्नाटकच्या होयसळ वंशातील राजा वीर सोमेश्वर याने विठ्ठलाच्या अंगभोगासाठी, नित्य पूजेसाठी 'हिरियगरंजे' नावाचे गाव दान दिल्याचा उल्लेख या ताम्रपटात व शिलालेखात आहे.

देवगिरीच्या यादवांचा 'चौऱ्याऐंशीचा शिलालेख' (शके ११९५ / इ.स. १२७३):

विठ्ठल मंदिराच्या उत्तर प्रवेशद्वाराजवळ हा प्रसिद्ध शिलालेख आहे. देवगिरीचे यादव राजे रामचंद्रदेव यादव आणि त्यांचे कल्पक प्रधान हेमाडपंत (हेमाद्री पंडित) यांच्या काळात मंदिराचा भव्य जीर्णोद्धार झाला. या जीर्णोद्धारासाठी ज्या ८४ देणगीदारांनी (दात्यांनी) मदत केली, त्यांची नावे यात कोरलेली आहेत. यावरून स्पष्ट होते की १३ व्या शतकात पंढरपूरला राष्ट्रव्यापी वैभव प्राप्त झाले होते.

### २. श्री विठ्ठल मूर्तीचे सूक्ष्म अवयववार विश्लेषण:

पुरातत्वीय आणि मूर्तीशास्त्राच्या निकषांवर विठ्ठलाची मूर्ती अत्यंत प्राचीन आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. ही मूर्ती अंदाजे ३ फूट ९ इंच म्हणजेच पीठिका धरून सुमारे ४ फुटांपेक्षा जास्त उंचीची असून ती एका विशिष्ट काळसर वालुकामय पाषाणाची बनलेली आहे. ही मूर्ती त्रिमितीय नसून, तिच्या पाठीमागे पाषाणाचाच एक मजबूत आधारस्तंभ कोरलेला आहे, जो मूर्तीला डोक्यापासून पायापर्यंत घट्ट धरून ठेवतो. याच शास्त्रीय रचनेमुळे शतकानुशतके होणारे अभिषेक आणि लाखो भक्तांचा चरणस्पर्श सोसूनही मूर्ती आजही सुरक्षित आहे.

**मूर्तीवरील सुप्त चिन्हे, लांछने आणि त्यांचे महत्त्व:**

जेव्हा देवाची महापूजा होते आणि सर्व अलंकार उतरवले जातात, तेव्हा पाषाणावर प्राचीन



काळी कोरलेली काही विशिष्ट चिन्हे स्पष्टपणे दिसतात.

**श्रीवत्स लांछन:** विठ्ठलाच्या छातीवर उजव्या बाजूला हे चिन्ह कोरलेले आहे. मूर्तीशास्त्रात हे लक्ष्मीचे निवासस्थान मानले जाते. हे चिन्ह विठ्ठलाचे सर्वोच्च 'विष्णू रूप' सिद्ध करते.

**भृगुलता किंवा भृगुचरण:** छातीवर डाव्या बाजूला एका छोट्या पाऊलखुणेसारखे चिन्ह दिसते. पौराणिक कथेनुसार, परीक्षा घेण्यासाठी भृगु ऋषींनी विष्णूच्या छातीवर लाथ मारली होती, तेव्हा विष्णूंनी राग न धरता ऋषींच्या चरणांची विचारपूस केली. देवाच्या या क्षमाशील आणि वत्सल स्वभावाची साक्ष म्हणून हे चिन्ह विठ्ठलाच्या छातीवर कोरलेले आहे.

**यज्ञोपवीत /जानवे:** खांद्यावरून डाव्या बाजूला पोटाकडे जाणारे एक अतिशय सूक्ष्म पाषाण-जानवे मूर्तीवर स्पष्टपणे कोरलेले दिसते, जे मूर्तीचे वैदिक आणि शास्त्रीय अधिष्ठान स्पष्ट करते.

### ४.ऐतिहासिक विस्थापन, संघर्ष आणि पुनर्स्थापनेचा इतिहास:

विठ्ठल मूर्तीचा इतिहास जितका भक्तीभावाने नटलेला आहे, तितकाच तो परकीय आक्रमणांच्या काळातील संघर्षानेही भरलेला आहे. मूर्तीचे रक्षण करण्यासाठी इतिहासकाळात अनेकदा ती मूळ गाभाऱ्यातून हलवण्यात आली होती.

**विजयनगर (हंपी) येथील विस्थापन (१५ वे ते १६ वे शतक):**

१५ व्या शतकाच्या उत्तरार्धात, दक्षिण भारतात बहामनी आणि इतर इस्लामी आक्रमणांमुळे मंदिरांची विटंबना होण्याचा धोका निर्माण झाला होता. त्या काळात मूर्ती सुरक्षित राहावी म्हणून, किंवा विठ्ठलाचे परमभक्त असलेले विजयनगर साम्राज्याचे महान राजे कृष्णदेवराय (काही संशोधकांच्या मते त्यांचे पूर्वज) ही मूळ मूर्ती पंढरपूरहून कर्नाटकातील आपल्या 'हंपी' (विजयनगर) या राजधानीत घेऊन गेले. तिथे त्यांनी तुंगभद्रा नदीच्या काठी भव्य 'विजय विठ्ठल मंदिर' (जिथे प्रसिद्ध दगडाचा रथ आहे) बांधून या मूर्तीची स्थापना केली होती.

**संत भानुदासांचे अलौकिक कार्य आणि पुनरागमन:**

महाराष्ट्राचे लाडके संत एकनाथ महाराज यांचे पणजोबा संत भानुदास महाराज हे विठ्ठलाचे परम भक्त होते. विठ्ठलाच्या विरहाने व्याकुळ होऊन ते कर्नाटकातील हंपीला गेले. त्यांच्या अथांग आणि निष्कपट भक्तीच्या बळावर त्यांनी विजयनगरच्या राजाचे मन जिंकले.

एका रात्री देवाने स्वतः भानुदासांच्या भक्तीला प्रसन्न होऊन त्यांच्यासोबत चालण्याचे मान्य केले, अशी आख्यायिका आहे. संत भानुदास महाराज ती मूळ मूर्ती विजयनगरहून पुन्हा पंढरपुरात घेऊन आले. तो दिवस 'कार्तिकी एकादशी'चा होता. म्हणूनच वारकरी संप्रदायात आषाढीइतकेच कार्तिकी एकादशीला पुनरागमनाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**अन्य गुप्त विस्थापने:**

इतिहासातील इतर आक्रमणांच्या वेळीही बडवे आणि पुजाऱ्यांनी मूर्ती कधी पंढरपूर जवळील चिंचेच्या बागेत, तर कधी मंदिराच्या परिसरातील एका गुप्त विहिरीत लपवून ठेवली होती, ज्याचे ऐतिहासिक संदर्भ मोडी कागदपत्रांमध्ये मिळतात.

### ५.मूर्तीचे वैज्ञानिक जतन: झीज आणि वज्रलेप प्रक्रिया

विठ्ठलाची मूर्ती वालुकामय पाषाणाची असल्याने, तिच्यावर दररोज होणारे पंचामृत अभिषेक, पाणी, दुधाचा संपर्क आणि शतकानुशतके लाखो भक्तांनी चरणावर ठेवलेले डोके (चरणस्पर्श) यांमुळे २० व्या शतकाच्या उत्तरार्धात मूर्तीची झीज होण्यास सुरुवात झाली होती. चरणांचे बोटे आणि छातीवरील भाग घासले जात होते.

**भारतीय पुरातत्व विभागाचे संशोधन:**

मूर्तीचे मूळ रूप नष्ट होऊ नये म्हणून शासनाने भारतीय पुरातत्व विभागाच्या तज्ज्ञांची मदत घेतली.

**वज्रलेप प्रक्रिया:** गेल्या काही दशकांत विशेषतः १९८८ आणि त्यानंतर २०१२ च्या सुमारास मूर्तीवर वैज्ञानिक पद्धतीने 'वज्रलेप' सिलिकॉन आणि विशिष्ट रसायनांचे लेपन करण्यात आला. पाषाणातील सूक्ष्म छिद्रे बंद करून त्याला कडकपणा आणणे हा यामागचा उद्देश होता.

**वर्तमान सुरक्षा:** आता मूर्तीची झीज रोखण्यासाठी अभिषेकाचे नियम कडक करण्यात आले आहेत आणि चरणांच्या संरक्षणासाठी विशेष काळजी घेतली जाते, जेणेकरून ही प्राचीन वारसा वास्तू पुढील हजारो वर्षे तशीच टिकून राहील.

### ६.वाङ्मयीन संदर्भ आणि संत चळवळीचा सामाजिक प्रभाव:

विठ्ठलाच्या या मूर्ती रूपाला महाराष्ट्राच्या संतांनी केवळ देव मानले नाही, तर त्याला समाजात समता आणणारे एक 'क्रांतिकारी माध्यम' बनवले. संतांच्या अभंगात मूतीर्शास्त्राचे सुंदर वर्णन आढळते:

***संत ज्ञानेश्वर महाराज,***

*'रुप पाहतां लोचनीं ।*
*सुख झालें वो साजणी ॥'*

ज्ञानेश्वरांनी विठ्ठलाला 'माऊली' (आई) म्हणून संबोधले, ज्यामुळे देवाचे उग्र रूप संपून तो अत्यंत जवळचा वाटू लागला.

संत तुकाराम महाराजः

*'कटीं कर ठेवूनिया*
*विटेवरी उभा ।*
*पहा विठ्ठलाची शोभा ॥'*

तुकोबांनी कंबरेवर हात असण्याच्या मुद्रेला मानवी जीवनातील निश्चिंततेशी जोडले.

**संत चोखामेळा:**

चोखामेळा सारख्या उपेक्षितांना मंदिराच्या पायरीवर उभे राहावे लागले, तरी त्यांनी विठ्ठलाच्या 'समदृष्टी'वर शंका घेतली नाही. त्यांनी म्हटले की,

'ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा,
तसा चोखा डोंगा परी भाव नोहे डोंगा.'

विठ्ठलाच्या मूर्तीने जात-पात, वर्ग विसरून सर्वांना एकत्र आणण्याचे काम केले.

पंढरपूरच्या श्री विठ्ठलाची मूर्ती म्हणजे केवळ एक पाषाण किंवा कलाकृती नाही. ती ऐश्वर्य आणि वैराग्य, शिव आणि विष्णू हरी-हर, तसेच देव आणि भक्त यांच्यातील अद्वैताची एकतेची सर्वोच्च परिसीमा आहे. मूर्तीचे शास्त्रीय अवयव, तिच्यावरील क्षमाशीलता दर्शवणारी चिन्हे आणि तिचा ऐतिहासिक प्रवास हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा आणि सांस्कृतिक जडणघडणीचा जिवंत दस्तऐवज आहे. राजकीय सत्तांनी या मूर्तीला मंदिरे आणि संरक्षण दिले असेल, परंतु या विटेवर उभा असलेल्या विठ्ठलाला बहुजनांच्या, शेतकऱ्यांच्या आणि कष्टकऱ्यांच्या मनाच्या सिंहासनावर कायमचे अधिष्ठित करण्याचे अजरामर कार्य वारकरी संत चळवळीने केले आहे. म्हणूनच, हा विठ्ठल आजही भारताच्या सांस्कृतिक पटलावरील सर्वात वैशिष्ट्यपूर्ण आणि जिवंत दैवत मानला जातो. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि आध्यात्मिक जीवनाचा केंद्रबिंदू म्हणजे पंढरपूरचा पांडुरंग. जगातील सर्व देवांमध्ये विठ्ठलाचे रूप अत्यंत आगळेवेगळे आहे. जिथे इतर देव हातात शस्त्रे घेऊन, भव्य सिंहासनावर किंवा आक्रमक मुद्रेत दिसतात; तिथे पंढरीचा विठुराया एका साध्या विटेवर, दोन्ही हात कमरेवर ठेवून, अत्यंत शांत आणि मंदस्मित मुद्रेत उभा आहे. हा देव चमत्कारांपेक्षा 'भाव' आणि 'भक्ती'चा देव मानला जातो.

- ९५६१५९४३०६

# रोहित मुळेच गंभीर बनला कोच, अन् त्याच्या मुळावर उठला तोच!

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

टिम इंडियाला सलग दोन आयसीसी करंडक जिंकून देणारा कर्णधार रोहित शर्मा सध्या मोठा डाव खेळण्यात कमी पडत असल्याने प्रशिक्षक गौतम गंभीर, रोहिताला संघाबाहेर काढण्याचे बहाणे शोधत आहे पण त्याच्या चाली त्याच्यावरच उलटत असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. हे प्रकरण नेमकं काय आहे हे आपण प्रस्तुत लेखात जाणून घेऊया.

**आता संघात स्थान मिळण्यावरही संकट, संपूर्ण कहाणी**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने रोहित शर्माच्या निवृत्तीच्या अफवा फेटाळून लावल्या आहेत. रविवारी लॉर्ड्स क्रिकेट ग्राउंडवर इंग्लंडविरुद्ध होणाऱ्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात हा दिग्गज खेळाडू भारतासाठी आपला शेवटचा सामना खेळणार नाही, असे बीसीसीआयने स्पष्ट केले आहे. मात्र, भारतीय ड्रेसिंग रूममध्ये, विशेषतः रोहित शर्मा, विराट कोहली आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्यात सर्व काही आलबेल नाही, ही गोष्ट नाकारता येत नाही. हीच परिस्थिती दोन्ही वरिष्ठ खेळाडू आणि निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांच्यातील संबंधांबाबतही म्हणता येईल.

या आठवड्याच्या सुरुवातीला, पीटीआयच्या एका रिपोर्टनंतर सोशल मीडियावर खळबळ माजली होती. ज्यामध्ये असा दावा करण्यात आला होता की, रोहित शर्मा रविवारी आपला शेवटचा एकदिवसीय सामना खेळू शकतो, कारण निवडकर्त्यांनी त्याला २०२७ च्या वनडे वर्ल्ड कप संघात समाविष्ट न करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, बीसीसीआयचे सचिव देवजीत सैकिया यांनी हे वृत्त फेटाळून लावले. आता आणखी एक नवा रिपोर्ट समोर आला आहे, ज्यामध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी दरम्यान रोहित शर्मा आणि गौतम गंभीर यांच्यातील संबंध कसे बिघडले, हे सांगण्यात आले आहे. पीटीआयच्या रिपोर्टनुसार, रोहितने स्वतः गंभीरशी संपर्क साधून त्याला २०२४ मध्ये भारतीय संघाचे प्रशिक्षकपद स्वीकारण्याचा प्रस्ताव दिला होता.

**आयपीएल सामन्यादरम्यान रोहितने गंभीरला दिला होता कोचिंगचा प्रस्ताव**

पीटीआयच्या सूत्रांनुसार, रोहितने गंभीरशी तेव्हा संपर्क साधला होता जेव्हा कोलकाता नाईट रायडर्स संघ मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर एक सामना खेळत होता. वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, रोहितने एका सराव सत्रादरम्यान गंभीरशी चर्चा केली आणि त्याला भारतीय संघात सामील होण्यास सांगितले. त्यावर भारताच्या या माजी सलामीवीराने उत्तर दिले होते, "जर तू कर्णधार पदावर कायम राहणार असशील, तर मी नक्कीच संघात सामील होईन." हे सर्व घडत असताना, रोहितच्या एका जवळच्या व्यक्तीने त्याला चेतावणी दिली होती की, गंभीरसोबत काम करणे हे एक वेगळे आव्हान असेल, कारण रोहितला राहुल द्रविडच्या कोचिंग शैलीची सवय झाली होती. रोहित आणि गंभीर यांच्यातील मतभेद सर्वात आधी न्यूझीलंडविरुद्धच्या घरच्या कसोटी मालिकेतील भारताच्या लाजीरवाण्या पराभवादरम्यान समोर आले. मात्र, ऑस्ट्रेलिया दौऱ्यादरम्यान दोघांमधील दरी अधिकच वाढली.

ऑस्ट्रेलियातील रोहितच्या या एका विधानामुळे आले मतभेद रोहित स्वतः खराब फॉर्ममुळे सिडनी कसोटी सामन्यातून बाहेर राहू इच्छित होता, हे सर्वांना माहीत आहे. पीटीआयच्या वृत्तानुसार, आगरकर यांनी रोहितला असे पाऊल न उचलण्याचा सल्ला दिला होता, कारण यामुळे इंग्लंड दौऱ्यासाठी त्याच्या निवडीत अडचणी येऊ शकल्या असत्या. मात्र, माजी भारतीय कर्णधाराने तो कसोटी सामना खेळला नाही आणि कसोटी सामन्यादरम्यान एका दिवशी ब्रॉडकास्टरला दिलेल्या मुलाखतीत तो म्हणाला, "मी दोन मुलांचा बाप आहे. माझ्यासाठी काय चांगले आहे हे मला ठाऊक आहे." या विधानामुळे आगरकर आणि गंभीर दोघेही थक्क झाले आणि येथूनच त्यांच्या संबंधांमध्ये दुरावा निर्माण झाला.

**वनडे कप्तानीवरून हटवल्याने रोहित शर्मा खूश नव्हता**

रोहितने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर, गेल्या वर्षी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेपूर्वी त्याला वनडे कप्तानीवरूनही हटवण्यात आले होते. रोहितला हटवून त्याच्या जागी शुभमन गिलला कर्णधार बनवण्याबाबत गंभीर आणि आगरकर या दोघांचे एकच मत होते. जेव्हा रोहितला याबद्दल समजले, तेव्हा तो अजिबात खूश नव्हता आणि त्यानंतर त्यांच्यात झालेली चर्चा फारशी चांगली राहिली नाही. यानंतर रोहितने दूरदृष्टी ठेवत विश्वचषकाची तयारी सुरू केली, परंतु गंभीर आणि आगरकर यांनी त्याला कोणतेही स्पष्ट उत्तर दिले नाही. निवड समितीने त्याला संघातून बाहेर केल्याची बातमी ज्या दिवशी समोर आली, त्या दिवशी रोहितचा स्वतःवर विश्वास बसत नव्हता; कारण त्याच दिवशी त्याने कार्डिफमध्ये इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या वनडे सामन्यात ४७ चेंडूत २६ धावांची खेळी केली होती. आता ५० षटकांच्या या फॉरमॅटमध्ये या दिग्गज खेळाडूचे भविष्य काय असेल, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

**भारतीय क्रिकेटमध्ये असा प्रकार नवा नाही**

२००३ च्या वनडे विश्वचषकानंतर जेंव्हा जॉन राईटने भारतीय संघाचे प्रशिक्षकपद सोडले त्यावेळी कर्णधार असलेल्या सौरव गांगुलीनेचे ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार ग्रेग चॅपेलला टिम इंडियाचा कोच म्हणून आणले होते.

पुढे जात त्यांच्यामध्ये असाच बेबनाव झाला आणि ग्रेग चॅपेलने गांगुलीला निव्वळ कर्णधार पदावरूनच काढले नाही तर संघातूनही घालवले होते. आता त्याचीच पुनरावृत्ती होण्याच्या मार्गावर असून गंभीरने रोहितचे कर्णधारपद खाल्लेच आहे, पण आता त्याच्या संघातील जागेवरही गदा आणू पहात आहे. बीसीसीआयने त्वरीत हस्तक्षेप करून प्रकरण थंड्या बासनात टाकले असले तरी गौतम गंभीर सारख्या सनकी माणसासोबत रोहितला काम करणं दिसतं तेवढं सोपं नाही.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# नितीन गडकरी यांच्या प्रयत्नांमुळे दिव्यांगांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य

## जनसंपर्क कार्यक्रमात निवेदनांचा पाऊस, अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यवाहीचे आदेश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या जनसंपर्क कार्यक्रमात निवेदनांचा पाऊस पडला. गडकरी यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना सर्व निवेदनांवर तात्काळ कार्यवाहीचे निर्देश दिलेत. यावेळी गडकरींच्या प्रयत्नांमुळे कृत्रिम अवयवय तसेच साहित्य प्राप्त झाल्यामुळे दिव्यांगांच्या चेहऱ्यावर हसू फुलले होते.



गडकरी वाडा महाल येथील गडकरी यांच्या जनसंपर्क कार्यालयात (रविवार, दि. १९ जुलै) सकाळपासूनच नागरिकांनी गर्दी केली होती. विविध मागण्यांची तसेच अडचणींची निवेदने घेऊन नागरिकांनी गडकरी यांची भेट घेतली. यावेळी दिव्यांग बांधवांनी गडकरी यांची भेट घेऊन कृत्रिम अवयवांची मागणी केली. काहींना व्हीलचेअर तसेच कृत्रिम पाय गडकरी यांच्या हस्ते देण्यात आले. या क्षणाला उपस्थित दिव्यांगांच्या चेहऱ्यावर हसू फुलले होते. त्यांनी गडकरी यांच्या प्रयत्नांमुळे मिळालेल्या मदतीकरिता कृतज्ञता व्यक्त केली.

नागरिकांची निवेदने स्वीकारताना गडकरी यांनी त्यांचे म्हणणे ऐकून घेत कार्यवाहीचा विश्वास दिला. नागपूर महानगरपालिका, नागपूर सुधार प्रन्यास, जिल्हाधिकारी कार्यालय आदी शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी जनसंपर्क कार्यक्रमाला उपस्थित होते. नागरिकांच्या तक्रारी ऐकताना गडकरी यांनी थेट संबंधित अधिकाऱ्यांना लक्ष घालण्याच्या सूचना दिल्या.

ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, समाजसेवी संस्थांचे पदाधिकारी, धार्मिक संस्थानांचे पदाधिकारी आदींनी यावेळी आपली निवेदने गडकरी यांना दिलीत. विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून उपचारासाठी मिळणारी मदत उपलब्ध करून दिल्याबद्दल अनेक रुग्णांनी गडकरी यांचे आभार मानले. मंत्री महोदयांनी दिलेला शब्द आणि कार्यालयाच्या वतीने करण्यात आलेला पाठपुरावा यामुळेच ही मदत मिळणे शक्य झाल्याची भावना रुग्णांच्या नातेवाईकांनी व्यक्त केली.

## थोडक्यात

### रेल्वे सुरक्षा दलाच्या तत्परतेमुळे एका प्रवाशाला त्याचे हरवलेले सामान सापडले

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर.**
रेल्वे सुरक्षा दलाच्या तत्परतेमुळे एका प्रवाशाला त्याचे हरवलेले सामान सापडले. प्रवाशाने आरपीएफ पथक, भारतीय रेल्वे आणि



१३९ हेल्पलाईन पथकाचे मनःपूर्वक आभार मानले. मिळालेल्या माहितीनुसार, बल्लारपूर शहरातील पेपर मिलमध्ये काम करणारे शैलेंद्र आर्य हे १८/०७/२०२६ रोजी आपल्या कुटुंबासोबत बल्लारशाहहून गोंदियाला १२७७१ क्रमांकाच्या रायपूर एक्सप्रेसने प्रवास करत होते. ट्रेन दुपारी १२ वाजता गोंदिया स्टेशनवर पोहोचली आणि घरी पोहोचल्यावर त्यांच्या लक्षात आले की त्यांची एक बॅग ट्रेनमध्येच राहिली आहे.त्यांनी तात्काळ १३९ हेल्पलाईनवर फोन करून बॅग हरवल्याची तक्रार दाखल केली.तक्रार दाखल केल्याच्या एका तासाच्या आत, त्यांना १३९ हेल्पलाइनवरून फोन आला की, राजनांदगाव स्टेशनवर आरपीएफ टीमने त्यांचे सामान सुरक्षितपणे ताब्यात घेतले आहे.त्यांनी राजनांदगावला जाऊन आरपीएफ स्टेशनवरून आपले सामान घ्यावे.
प्रवासी शैलेंद्र आर्य रविवारी सकाळी ११ वाजता राजनांदगाव आरपीएफ स्टेशनवर पोहोचले आणि त्यांनी आपले सामान घेतले. त्यांनी आरपीएफ टीम, भारतीय रेल्वे आणि १३९ हेल्पलाइन यांचे मनःपूर्वक आभार मानले.

### सचिन इप्पर यांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेसच्या ६०० कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

**विकासाच्या राजकारणावर विश्वास ठेवून कार्यकर्त्यांनी भाजपची वाट धरली : बावनकुळे**



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
वाशिम जिल्ह्यातील रिसोड-मालेगाव विधानसभा मतदारसंघातील युवक कॉंग्रेसचे प्रदेश सचिव सचिन तुकाराम इप्पर यांच्या नेतृत्वाखाली सुमारे ६०० कार्यकर्त्यांनी सोमवारी नागपूर येथे भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. राज्याचे महसूल मंत्री तथा नागपूर आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी बोलताना बावनकुळे यांनी सचिन इप्पर यांच्या सामाजिक आणि संघटनात्मक कार्याचे कौतुक केले. "तळागाळात काम करणाऱ्या नेतृत्वावर जनतेचा विश्वास असतो. विकासाच्या राजकारणावर विश्वास ठेवून आज मोठ्या संख्येने कार्यकर्ते भाजपमध्ये सहभागी झाले आहेत. हा विकासाच्या विचारांचा विजय आहे असे ते म्हणाले. नव्याने पक्षात दाखल झालेल्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी केंद्र व राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी सक्रियपणे काम करण्याचे आवाहन केले. प्रत्येक बूथ मजबूत करून जनतेशी सातत्याने संपर्क ठेवण्यावर त्यांनी भर दिला. महसूल विभागाच्या कामकाजात अधिक पारदर्शकता आणि गती आणण्यासाठी ७/१२, ८-अ उतारे, नावनोंदणी आणि इतर महसुली सेवा ऑनलाइन व सुलभ करण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचेही बावनकुळे यांनी सांगितले.
सचिन इप्पर यांनी पक्ष नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत विकासाभिमुख राजकारणासाठी कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. वाशिम जिल्ह्यात भाजपची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी कार्यकर्त्यांसह पूर्ण क्षमतेने काम करू, अशी ग्वाही त्यांनी दिली. या कार्यक्रमाला रीसोडचे निवडणूक प्रमूख नकुल देशमुख, भाजप नेत्या अमृता देशमुख, गजानन लाटे, सुभाषराव खरात , डॉ. बळीराम गरकल, भिकाजी नागरे, गजानन देशमुख आदी पक्षाचे पदाधिकारी,आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

### मोरया फाउंडेशनतर्फे ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार, नृत्य स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
मोरया फाउंडेशनच्या वतीने समाजातील ज्येष्ठ नागरिकांचा गौरव करण्याच्या उद्देशाने अमरनगर समाज भवन, हनुमान मंदिर, चिखलीचा राजा रोड येथे भव्य ज्येष्ठ नागरिक सत्कार सोहळा तसेच बाल नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार मोहन मते, परिवहन समितीच्या सभापती मंगला खेकरे, माजी नगरसेवक बाबाराव तायडे तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेसचे मुकेश रेवतकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यानंतर उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी माऊली ग्रुपने गजानन महाराजांचे स्तोत्रपठण सादर करून वातावरण भक्तिमय केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रजनी अविनाश चौहान यांनी केले. यावेळी आमदार मोहन मते यांनी मोरया फाउंडेशनच्या सामाजिक उपक्रमांचे कौतुक करत संस्थेच्या भावी कायार्साठी शुभेच्छा दिल्या. यानंतर उपस्थित ज्येष्ठ नागरिकांचा शाल, श्रीफळ व रोपटे देऊन सन्मान करण्यात आला.
त्यानंतर आयोजित करण्यात आलेल्या बाल नृत्य स्पर्धेत लहानग्यांनी विविध सांस्कृतिक सादरीकरणातून आपली कला सादर करत उपस्थितांची मने जिंकली. स्पर्धेतील विजेत्यांना तसेच सहभागी सर्व स्पर्धकांना मोरया फाउंडेशनचे अध्यक्ष अविनाश चौहान आणि शिवसेनाचे नगरसेवक सूरज गोजे यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व बक्षिसांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाची सांगता सर्व उपस्थितांसाठी आयोजित भोजनाने करण्यात आली.

## रायगड जिल्हा परिषद,ता.पेण येथील खारपाले प्राथमिक शाळेत इंडियन कॉपीराईट प्रोटेक्शनकडून शैक्षणिक साहित्याचे वाटप



**दै. सिंहवाणी वृत्त, गडब-गुरुनाथ तिरपणकर**
खारपाले,ता.पेण येथील अति दुर्गम भागातील शाळेत अँन्टीपायरसी सेल चे मुख्य तपासी अधिकारी राम जित(जितू) गुप्ता यांच्या संकल्पनेतून खारपाले येथील शाळेतील मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. जितू गुप्ता सर तळागाळातील गरीब गरजू सर्व सामान्य व्यक्तींना नेहमीच मदत करत असतात, महाराष्ट्र विविध ठिकाणी जितू गुप्ता सर यांचे सामाज उपयोगी उपक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाले आहेत. रामजित(जितू) गुप्ता यांनी रायगड जिल्ह्यातील खारपाले गावातील जि.प.प्राथमिक शाळेला भेट देऊन सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य प्रदान करुन सत्कार केला.दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचिही यावेळी सत्कार करण्यात आला.पुढील वर्षी सर्वात जास्त गुण संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना सायकल भेट देण्याचे आश्वासन दिले आहे.
सर्व प्रथम शाळेतील मुलांनी इशस्तवन सादर करुन मोठ्या उत्साहात स्वागत केले. गुप्ता सरांच्या या संकल्पनेतून मुलांमध्ये अभ्यासू वृत्ती निर्माण होऊन ते अधिक गतिमान जीवन घडवून आपापल्या कला कौशल्यांना वाव देण्यासाठी प्रयत्न करतील व त्यांना लागणाऱ्या यापुढे कोणत्याही प्रकारच्या गरजू शैक्षणिक वस्तू देण्याचे ठरविले आहे. तसेच शाळेतील सभागृहासाठी त्वरित चार फॅन देण्याचे कबूल केले. खारपाले येथील या प्राथमिक शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर, समाजसेविका राजकुमारी रामजित गुप्ता, समाजसेवक उत्तम भिकाजी बंगाले, समाजसेविका मनीषा गोडसे, कुसुम चोबे, राजेश कोठेकर, अनंत चवरकर रायगड शानच्या संपादिका अवंतिका म्हात्रे, सरपंच कविता गावंड, उपसरपंच पांडुरंग तुरे, सदस्य सुवर्णा कडू, महादेव चायाभोईर हे उपस्थित होते.या सर्व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.तसेच याप्रसंगी समाजसेविका शैला प्रमोद तुरे यांना इंडियन कॉपीराईट प्रोटेक्शनच्यावतीने "रायगड कन्या"पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाला खारपाले गावातील शिक्षक, विद्यार्थी, ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन मुख्याध्यापक मोकल यांनी केले. शेवटी शैला तुरे यांच्या निवासस्थानी सुग्रास भोजनाचे कार्यक्रमाची सांगता झाली.

## एच.एस.महात्मे संस्कार विहार स्कूलमध्ये उत्साहात 'ग्रीन डे' साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** एच.एस.महात्मे संस्कार विहार स्कूल, रमा नगर येथे ग्रीन डे मोठ्या उत्साहात साजरा १८ जुलै रोजी करण्यात आला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश जनसामान्यापर्यंत पोहोचविण्याचा उद्देशाने विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांमध्ये उत्स्फुर्त सहभाग नोंदविला. यावेळी शाळेच्या परिसरात तसेच आजूबाजूच्या परिसरात विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर रमानगर परिसरातून पर्यावरण जनजागृतीवर विद्यार्थी आणि शिक्षिकांद्वारा शोभायात्रा काढण्यात आली. हिरव्या रंगाची वेशभूषा परिधान केलेले विद्यार्थी पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणारे आकर्षक फलक हातात घेऊन सहभागी झाले होते. झाडे लावा, झाडे जगवा पर्यायवरण वाचवा भविष्य घडवा आपला परिसर स्वच्छ ठेवा अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. या शोभायात्रेला परिसराचे नागरिकांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अनेक नागरिकांनी घरा बाहेर येऊन हात हलवून प्रतिसाद दिला.

## नागपूर ग्रामीण राष्ट्रवादी कॉंग्रेसला नवे नेतृत्व, सलील देशमुख यांनी जिल्हाध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली

**शरद पवारांच्या विचारांचा गावागावात प्रसार करणार; संघटनबांधणीसह शेतकरी, युवकांच्या प्रश्नांवर भर**

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार)च्या नागपूर ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी नवनियुक्त सलील देशमुख यांनी आज पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत अधिकृतपणे पदभार स्वीकारला. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांनी दिलेली जबाबदारी स्वीकारताना नागपूर ग्रामीणमध्ये पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविणे, सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न प्राधान्याने सोडविणे आणि पक्षाला नवसंजीवनी देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.
पदभार स्वीकारल्यानंतर सलील देशमुख यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना, "शरद पवार साहेबांच्या पुरोगामी विचारांवर विश्वास ठेवून नागपूर ग्रामीणमधील प्रत्येक गावात, प्रत्येक घरापर्यंत पक्षाचा विचार पोहोचविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. शेतकऱ्यांचे प्रश्न, बेरोजगार युवकांना रोजगाराच्या संधी, महिलांचे



सक्षमीकरण, ग्रामीण भागातील रस्ते, पाणी, आरोग्य व शिक्षण यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर पक्ष प्रभावीपणे लढा उभारेल," असे सांगितले.
यावेळी पक्षाचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री रमेशचंद्र बंग, माजी आमदार विजय घोरमाडे, प्रकाश गजभिये, शब्बीर विद्रोही, प्रवीण कुंटे, चंद्रशेखर कोल्हे, अनिल साठोणे, अविनाश गोतमारे, वैशाली टालाटूले, किशोर गजभिये, फारुख अब्दुल, विनोद हरडे, दिनेश साळवे यांच्यासह जिल्ह्यातील पदाधिकारी, विविध आघाड्यांचे प्रतिनिधी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.
सोहळ्यात माजी मंत्री रमेशचंद्र बंग व माजी आमदार विजय घोरमाडे यांनी सलील देशमुख यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. नव्या नेतृत्वामुळे नागपूर ग्रामीणमध्ये पक्षाची संघटनात्मक उभारणी अधिक प्रभावी होईल, तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष अधिक सक्षमपणे जनतेसमोर जाईल, असा विश्वास उपस्थित नेत्यांनी व्यक्त केला.
यावेळी जिल्ह्यातील तालुकाध्यक्ष, माजी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, महिला आघाडी, युवक आघाडी, सामाजिक न्याय विभागाचे पदाधिकारी तसेच विविध सेलचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यकर्त्यांनी एकजुटीने पक्षविस्तारासाठी काम करण्याचा निर्धार व्यक्त करत नव्या जिल्हाध्यक्षांचे टाळ्यांच्या गजरात स्वागत केले.

**संघटन विस्तारावर विशेष भर**

पदभार स्वीकारल्यानंतर सलील देशमुख यांनी लवकरच नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचा दौरा करून कार्यकर्त्यांशी संवाद साधणार असल्याचे सांगितले. बूथस्तरापासून संघटन मजबूत करण्यासह युवकांना पक्षाशी जोडणे, नव्या कार्यकर्त्यांना संधी देणे आणि जनआंदोलनाच्या माध्यमातून नागरिकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी पक्ष सक्रिय राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. नव्या नेतृत्वाच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाला नागपूर ग्रामीणमध्ये नवचैतन्य मिळेल, असा आशावाद उपस्थित कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

## ऋषिपंचमीपूर्वी नदीघाटाचा प्रश्न निकाली काढा; अन्यथा हजारो भाविकांचा जीव धोक्यात!

**चांदणी बर्डी येथील श्री संत भाकरे महाराज सेवा आश्रमालगतच्या नदीपात्राकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष, लोकेश काळे यांचा इशारा**

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
नरखेड तालुक्यातील श्री संत भाकरे महाराज सेवा आश्रम, चांदणी बर्डी येथे दरवर्षी श्रावण महिना आणि ऋषिपंचमीच्या पावन पर्वानिमित्त महाराष्ट्रासह मध्य प्रदेशातील कानाकोपऱ्यातून हजारो भाविक दर्शनासाठी येतात. उत्तरवाहिनी नदीत पवित्र स्नान करून भाविक धार्मिक विधी पार पाडतात. मात्र यंदा आश्रमालगतच्या नदीपात्राची अत्यंत दयनीय अवस्था आणि सार्वजनिक बांधकाम



विभागाच्या हलगर्जीपणामुळे भाविकांच्या सुरक्षिततेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नदीचे खोलीकरण करण्यात आले असले तरी नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर काळा चिकण गाळ साचला आहे. त्यामुळे नदीत उतरणे अत्यंत धोकादायक बनले आहे. अनेक ठिकाणी काटेरी झुडपे, गवत आणि अस्वच्छता पसरली असून भाविक गाळात अडकून अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसाठी ही परिस्थिती जीवघेणी ठरू शकते.
दरवर्षी ऋषिपंचमीच्या दिवशी १५ ते २० हजारांहून अधिक भाविक या ठिकाणी स्नान, दर्शन आणि महाप्रसादासाठी उपस्थित राहतात. आश्रम परिसरात दिवसभर धार्मिक कार्यक्रम, महाप्रसाद आणि विविध आध्यात्मिक उपक्रम पार पडतात. मात्र नदीघाटाची झालेली दुर्दशा पाहता यंदा भाविकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे.
खरेदी-विक्री संस्थेचे संचालक लोकेश विनोद काळे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने नदीघाटातील गाळ काढून परिसर स्वच्छ करावा, काटेरी झुडपे हटवावीत, सुरक्षित स्नानघाट तयार करावा, धोकादायक ठिकाणी बॅरिकेड्स व सूचना फलक लावावेत, तसेच भाविकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी केली आहे.
भाविकांच्या श्रद्धेचा, सुरक्षिततेचा आणि धार्मिक परंपरेचा विचार करून प्रशासनाने तातडीने पावले उचलली नाहीत, तर ऋषिपंचमीच्या दिवशी कोणतीही दुर्घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्रशासन आणि सार्वजनिक बांधकाम विभागाची राहील, असा इशाराही लोकेश काळे यांनी दिला आहे.
हजारो भाविकांच्या आस्थेचे केंद्र असलेल्या या पवित्र स्थळाकडे प्रशासनाने केवळ कागदी कामापुरते न पाहता प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने कामे पूर्ण करावीत, अशी मागणी भाविकांसह परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

थोडक्यात

## सायबर फसवणुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या बँक खात्यांवर गोंदिया पोलिसांची कारवाई

### सायबर गुन्हे रोखण्यासाठी जनजागृतीसह संशयास्पद बँक खातेधारकांविरुद्ध गुन्हे दाखल

**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**

देशभरात सायबर फसवणुकीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असून, फसवणुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या बँक खात्यांवर गोंदिया जिल्हा पोलिसांनी धडक कारवाई सुरू केली आहे. भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र आणि राष्ट्रीय सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टलवर प्राप्त माहितीनुसार सायबर फसवणुकीत वापरल्या गेलेल्या बँक खात्यांच्या धारकांविरुद्ध गोंदिया जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांत एकूण २५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सायबर फसवणूक करणारे आरोपी स्वतःच्या नावाने बँक खाते न वापरता इतरांच्या खात्यांचा वापर करून फसवणुकीची रक्कम स्वीकारतात किंवा ती दुसऱ्या खात्यात वळवतात. यासाठी बेरोजगार, गरजू किंवा आर्थिक अडचणीत असलेल्या नागरिकांना काही रकमेचे आमिष दाखवून त्यांचे बँक खाते, एटीएम कार्ड, सिम कार्ड, चेकबुक आणि पासवर्ड मिळवले जातात. अशा खात्यांचा वापर करून मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक केली जाते.या पार्श्वभूमीवर गोंदिया पोलिसांनी अशा खातेधारकांविरुद्ध कायदेशीर कारवाईचा बडगा उगारला असून, सायबर गुन्हेगारांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

जिल्हा पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणत्याही अनोळखी व्यक्तीला आपले बँक खाते, एटीएम कार्ड, सिम कार्ड, चेकबुक, पासवर्ड किंवा ओटीपी देऊ नये. कोणत्याही प्रकारच्या आमिषाला बळी पडू नये. सायबर फसवणूक झाल्यास त्वरित १९३० या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा किंवा www.cybercrime.gov.in या पोर्टलवर तक्रार नोंदवावी. तसेच जवळच्या पोलीस ठाण्यात किंवा सायबर पोलीस ठाण्यात संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पोलीस अधीक्षक गोरख भामरे आणि अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात सायबर गुन्हे रोखण्यासाठी विशेष जनजागृती व कायदेशीर कारवाईची मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.

## दुर्ग शिवनेरी साकरण्याचा वर्ल्ड रेकॉर्ड




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

खासदार सांस्कृतिक महोत्सव समिती, नागपूर आणि शिववैभव किल्ले स्पर्धेच्या निमित्ताने साकारण्यात आलेल्या 'दुर्ग शिवनेरी'च्या प्रतिकृतीला प्रतिष्ठेच्या 'वर्ल्ड रेकॉर्ड बुक ऑफ इंडिया'मध्ये मानाचे स्थान मिळाले आहे. केवळ ४४.३७ सेकंदात ही प्रतिकृती यशस्वीरीत्या पूर्ण करण्याचा ऐतिहासिक विक्रम करण्यात आला. या दैदिप्यमान कामगिरीची दखल घेत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते या विक्रमाचा विशेष सन्मान करण्यात आला. या सत्कार सोहळ्याचे प्रास्ताविक खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष अनिल सोले यांनी केले. आपल्या प्रास्ताविकातून त्यांनी या उपक्रमाची आणि विक्रमापर्यंतच्या प्रवासाची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली.

सत्कारमूर्तींचा सन्मान केल्यानंतर उपस्थितांना मार्गदर्शन करताना नितीन गडकरी यांनी एक महत्त्वपूर्ण घोषणा केली. यंदाच्या वर्षीही ही 'शिववैभव किल्ले स्पर्धा' आयोजित केली जाणार असल्याचे सुतोवाच त्यांनी केले. स्पर्धकांचे आणि समितीचे मनोबल वाढवताना ते म्हणाले की, "कुठलाही विक्रम हा अंतिम नसतो. आपणच आपला विक्रम पुन्हा मोडू शकतो." त्यांच्या या प्रेरक शब्दांनी उपस्थितांमध्ये आणि स्पर्धकांमध्ये एक नवा उत्साह निर्माण केला. या गौरव सोहळ्याला स्पर्धा संयोजक संजय बंगाले, तसेच समितीचे प्रमुख सदस्य अविनाशजी घुशे, जयप्रकाश गुप्ता, राजेश बागडी, राजेश मिश्राजी आणि खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे सर्व पदाधिकारी व सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते.

## चिनोरा पारधी टोला येथे वर्षभरापासून नालेसफाई नाही!

### स्वच्छतेचा उडाला बोजवारा नाल्या तुंबल्याने पाणी पास होईणा, ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष



**दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा- धर्मेंद्र शेरकुरे**

पावसाळ्याचे दीड महिने उलटूनही गावातील नालेसफाई न झाल्याने पुर्णपणे स्वच्छतेचा पुरता बोजवारा उडाला आहे. चिनोरा ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या पारधी टोला, हुडकी व नविन वस्त्या, येथील नाल्या तुंबल्या असून पाणी पास न झाल्याने गावात घाणीचे साम्राज्य पसरले आहे, यामुळे डासांची उत्पत्ती होऊन गावातील लोकांचे आरोग्य धोक्यात असून, रोगराई वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पाहिजे तसा पाऊस न पडल्याने नाल्यातील कचरा, घाण तशीच साचली आहे. गेल्या वर्षी जून २०२५ मध्ये नालेसफाई करण्यात आली होती. तद्नंतर एक वर्ष पूर्ण होऊन नालीसफाई करण्यात आली नाही. गावातील लोकाचे आरोग्य धोक्यात असुन लवकरात लवकर नालेसफाई करण्यात यावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

> सरपंच तथा प्रशासक,व सचिव यांना पाच हजारांहून अधिक रक्कम खर्च करण्याचे अधिकार सरकारने काढुन टाकले आहे, त्यामुळे आम्ही गट विकास अधिकारी, पंचायत समिती वरोरा यांना नालेसफाईचा ठराव देऊन मागणी केली आहे. अजुनही आम्हाला जास्तीची रक्कम खर्च करण्याचे आदेश दिले नसल्यामुळे नालेसफाई करण्यात आली नाही.
>
> **– सौ. परचाके, सरपंच तथा प्रशासक, चिनोरा**

# प्रियकराच्या मदतीने नवऱ्याची सर्पदंशाने केली हत्या

### सात वर्षापूर्वी झाला होता प्रेमविवाह, पत्नीसह स्कूल व्हॅन ड्रायव्हर प्रियकर व गारूड्याला अटक

**वृत्तसंस्था, मेरठ**

सात वषार्पूर्वी लव्ह मॅरेज केलेल्या बायकोनं स्कूल मालक नवऱ्याच्या दुधात झोपेच्या गोळ्या घातल्या; मध्यरात्री प्रियकर आणि गारुड्याला बोलावून बेडवर मण्यार साप सोडून ठार मारलंअवघ्या सहा वर्षांपूर्वी लव्ह मॅरेज केलेल्या बायकोनं स्कूल संचालक असलेल्या पतीला सर्पदंश करून ठार मारल्याची भयावह घटना घडली. बायकोने व्हॅन ड्रायव्हर असलेल्या प्रियकरसोबत कट रचला. बायकोने दामिनीने प्रथम पती, अतुल कुमारला (वय ३२) झोपेच्या गोळ्या मिसळून दूध दिले. त्यानंतर मध्यरात्री दोन वाजता, तिने तिच्या प्रियकराला आणि गारुड्यांना बोलावून पलंगावर एक मण्यार साप सोडला. हा देशातील चार सर्वात विषारी सापांपैकी एक



आहे.

या घटनेनंतर, दामिनीने तिचा प्रियकर, तुषार पायला, याला दूर पाठवले आणि ती दुसऱ्या खोलीत झोपायला गेली. शुक्रवारी पहाटे सहा वाजता दामिनी तिच्या खोलीत परत आली आणि ओरडू लागली. तिने तिच्या कुटुंबीयांना सांगितले की अतुलला सापाने दंश केला आहे. साप खोलीतच होता आणि अतुलच्या पायावर दंशाच्या खुणा होत्या. हे पाहून कुटुंबीयांनी असा निष्कर्ष काढला की सर्पदंशामुळेच त्याचा मृत्यू झाला असावा. हा संपूर्ण प्रकार उत्तर प्रदेशातील मेरठमध्ये घडला.

चौकशीदरम्यान पत्नी दामिनी (३०) हिने सांगितले की तिला गरम होत होते आणि ती तिच्या मुलासोबत झोपायला खोलीबाहेर गेली होती. तिच्या जबानीमुळे संशय आला आणि त्यांनी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी दामिनीला ताब्यात घेऊन तिची चौकशी केली. कॉल डिटेल्समधून व्हॅन चालक तुषार पायलासोबत तिचे वारंवार होणारे संभाषण उघड झाले. जेव्हा तुषारला पकडण्यात आले, तेव्हा त्याने संपूर्ण कटाची कबुली दिली. त्याने सांगितले की अतुल त्यांच्या नात्यात अडथळा ठरत होता. अतुलने २० लाख रुपयांचा विमा देखील काढला होता.

हत्येनंतर, त्यांना विम्याच्या पैशातून नवीन आयुष्य सुरू करायचे होते. त्यामुळे, त्यांनी ५ लाख रुपयांना दोन गारुड्यांना कामावर ठेवले आणि अतुलला मण्यार सापाने दंश करवला. ही घटना हस्तिनापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. पोलिसांनी पत्नी, तिचा प्रियकर आणि दोन गारुड्यांना तुरुंगात पाठवले आहे.

## जीवन सन्मार्गानं न्यायचं असेल तर आदिशंकराचार्यांवरील 'ज्ञानियांचा कल्पतरु' हे पुस्तक महत्त्वाचे : प्रकाश एदलाबादकर

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

"जीवन सन्मार्गानं न्यायचं असेल तर आदिशंकराचार्यांवरील 'ज्ञानियांचा कल्पतरु' हे पुस्तक महत्त्वाचे आहे आणि ते प्रत्येकाने वाचले पाहिजे," असे प्रतिपादन संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक आणि सुप्रसिद्ध वक्ता प्रकाश एदलाबादकर यांनी केले.

डॉ. सदानंद पिंप्रीकर लिखित आणि नचिकेत प्रकाशन निर्मिती 'ज्ञानियांचा कल्पतरु - - जगतगुरू आद्यशंकराचर्य' या पुस्तकाच्या प्कर्शिन सोहळ्यात अध्यक्षस्थानावरुन बोलताना केले. आजची पिढी भरकटलेली आणि द्विधा असताना या पुस्तकाचं येणे समयोचित आणि मार्गदर्शक आहे आहे तसेच ढोंगी पुरोगाम्यांना थोपवण्यासाठीही हे पुस्तक महत्त्वाचे आहे असेही ते याप्रसंगी म्हणाले. स्त्रीमुक्ती, स्त्री स्वातंत्र्य चळवळी अलीकडील आहेत पण आद्यशंकाराचार्यांनी स्त्रीचे स्थान प्रथम आणि महत्त्वाचे आहे ते त्याकाळीच सांगितले असल्याचेही त्यांनी नमूद केले.

डॉ. सदानंद प्रिंप्रीकर यांनी लिहिलेल्या 'ज्ञानियांचा कल्पतरु जगतगुरू आद्यशंकराचर्य' या




पुस्तकाचे काल चिटणवीस सेंटर येथे प्रकाशन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी प्रकाश एदलाबादकर होते. आद्यशंकराचार्यांच्या दशोपनिषदांचे आणि अध्यात्मिक क्षेत्रातील अभ्यासक जयंत अरगडे यांची विशेष अतिथी म्हणून उपस्थिती होती. संस्कृत विदुषी डॉ. विभा क्षीरसागर यांनी पुस्ताकवर भाष्य केले. यावेळी मंचावर लेखकासह नचिकेत प्रकाशनचे श्रीनिकेत सांबरे उपस्थित होते.

'ज्ञानियांचा कल्पतरु'मधून लेखकाने आद्यशंकराचार्यांच्या जीवनाबरोबरच त्यांनी सांगितलेले अध्यात्मही सोप्या भाषेत सांगितले असून हे पुस्तक लिहिताना लेखकाने प्रचंड मेहनत घेतली असल्याचे जाणवते आणि त्यांची भाषा अतिशय ओघवती असल्याचे मत डॉ. विभा क्षीरसागर यांनी व्यक्त केले. लेखकाने या पुस्तकात नेमके श्लोक उद्धृत केले आहेत ज्याद्वारे शंकराचार्यांच्या शिकवणीचा बोध होतो आणि सामान्य माणसाला ते सहज समजतात, अशा श्लोकांची निवड करणे हे लेखकाचे कौशल्य असल्याचे त्या म्हणाल्या. पुस्ताकवर सविस्तर भाष्य त्यांनी केले.

"लेखकाने आद्यशंकराचार्यांच्या अद्वैत सिद्धांताची अगदी नेमकेपणे फोड करुन सांगितली आहे आणि त्यांचे अध्यात्म अतिशय कौशल्याने उलगडून दाखवले आहे असे विशेष अतिथी जयंत अरगडे म्हणाले. अद्वैतवादाचा लेखकाने किती सखोल विचार केला आहे हेही या पुस्तकातून दिसून येत असल्याचे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नचिकेत प्रकाशनच्या श्रीनिकेत सांबरे यांनी केले तर मनोगतात लेखक डॉ. सदानंद पिंप्रीकर यांनी व्यवसायाने भूगर्भशास्त्रज्ञ असूनही आद्यशंकराचार्यांवर पुस्तक लिहिण्याची प्रेरणा कशी मिळाले याविषयी सविस्तर सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वृषाली देशपांडे यांनी केले आणि आभार नीता पिंप्रीकर यांनी मानले.

## गीता पठण व दुर्ग स्पर्धेच्या विश्वविक्रमाचे अधिकृत प्रमाणपत्र देऊन नितीन गडकरी यांचा विशेष गौरव

### खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीतर्फे सन्मानपत्रांचे वितरण उत्साहात

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीतर्फे शनिवारी गडकरी वाडा, महाल येथे सन्मानपत्र वितरण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह मंचावर खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल सोले, सचिव जयप्रकाश गुप्ता, कोषाध्यक्ष राजेश बागडी, ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानचे डॉ. राजू मिश्रा, किल्ले अभ्यासक अतुल गुरु, संजय बंगाले, राजू कनाटे यांच्यासह समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमात खासदार सांस्कृतिक महोत्सवांतर्गत आयोजित भगवद्गीता पठण




उपक्रम आणि दुर्ग स्पर्धेच्या माध्यमातून नोंदविण्यात आलेल्या विश्वविक्रमांचे अधिकृत प्रमाणपत्र नितीन गडकरी यांना नचिकेत अग्रवाल, रेणू अग्रवाल यांच्या हस्ते प्रदान करून त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच भगवद्गीता पठण उपक्रमामध्ये सहभागी शिक्षकांचा तसेच किल्ले स्पर्धेतील विजेत्यांचा नितीन गडकरी यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. हा उपक्रम यशस्वी करून दाखविल्याबद्दल सर्व सहभागींचे मनःपूर्वक अभिनंदन करताना नितीन गडकरी म्हणाले, यंदा आपण केलेला विश्वविक्रम पुढील वर्षी मोडण्याचा संकल्प करूया.

समाजातील सुखांक वाढविण्याचा हा उपक्रम असून, या महोत्सवामुळे समाजातील अनेक घटकांना कार्य करण्याची संधी मिळाली आहे. विविध क्षेत्रांतील प्रतिभांना प्रोत्साहन देण्याचे महत्त्वपूर्ण काम खासदार सांस्कृतिक महोत्सव समिती सातत्याने करत आहे.

यावेळी समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल सोले यांनी प्रास्ताविकात खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्या विविध सांस्कृतिक, शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. भारतीय संस्कृतीचे जतन, राष्ट्रभावना जागृत करणे आणि नव्या पिढीला संस्कारक्षम उपक्रमांशी जोडणे हे समितीचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे संचालन योगेश बन यांनी केले, तर आभार प्रदर्शन अनिल शिवणकर यांनी केले.

## एडुसन फाउंडेशन और तांदळे गुरुजी रिसोर्सेस एंड डेवलपमेंट (एनजीओ) के बीच समझौता

**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी**

समाज में शिक्षा, कौशल विकास, उद्यमिता, सामाजिक जागरूकता तथा समग्र विकास को बढ़ावा देने के उद्देश्य से एडुसन फाउंडेशन और तांदळे गुरुजी रिसोर्सेस एंड डेवलपमेंट (एनजीओ) के बीच एक समझौता ज्ञापन पर हस्ताक्षर किए गए। इस समझौते के अंतर्गत दोनों संस्थाएँ संयुक्त रूप से शैक्षणिक कार्यक्रम, कार्यशालाएँ, सेमिनार, कौशल विकास प्रशिक्षण, उद्यमिता विकास कार्यक्रम, स्टार्टअप जागरूकता अभियान, महिला एवं युवा सशक्तिकरण, डिजिटल एवं वित्तीय साक्षरता, पर्यावरण संरक्षण, स्वास्थ्य जागरूकता, वरिष्ठ नागरिक कल्याण पहल, सामाजिक जागरूकता अभियान, अनुसंधान, प्रकाशन तथा विभिन्न जनहितकारी गतिविधियों का आयोजन करेंगी।



इस सहयोग के माध्यम से विद्यार्थियों, युवाओं, महिलाओं, ग्रामीण एवं शहरी समुदायों तथा समाज के विभिन्न वर्गों को गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण, मार्गदर्शन और विकास के बेहतर अवसर उपलब्ध कराने का दोनों संस्थाओं का संकल्प है। दोनों संस्थाओं के प्रतिनिधियों ने विश्वास व्यक्त किया कि इस समझौता ज्ञापन के माध्यम से शैक्षणिक, सामाजिक और तकनीकी क्षेत्रों में प्रभावी सहयोग को बढ़ावा मिलेगा तथा समाज के समग्र विकास के लिए एक सशक्त मंच तैयार होगा।

## रँकर्स हब, बेसाच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार सोहळा, करिअर नियोजन व कौशल्याधारित शिक्षणाचा दिला मंत्र

### विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सकारात्मक विचारसरणी आणि पर्यायी करिअर पर्यायांची गरज अधोरेखित

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

बेसा येथील रँकर्स हबतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व मार्गदर्शन सोहळा शनिवारी श्री भवानी सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. इयत्ता ८ वी, ९ वी, १० वी, १२ वी तसेच अबॅकस विभागातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. शैक्षणिक गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासोबतच विद्यार्थ्यांना करिअर नियोजन, कौशल्याधारित शिक्षण आणि सकारात्मक विचारसरणीचे महत्त्व पटवून देणारा हा सोहळा विद्यार्थी व पालकांसाठी प्रेरणादायी ठरला.

कार्यक्रमाचे उद्घाटन महापौर नीता ठाकरे आणि परिवहन सभापती मंगलाताई खेकरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक स्वागत नृत्याने उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाचे मान्यवरांनी कौतुक करत त्यांच्यातील सुप्त कलागुणांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची गरज व्यक्त केली.

यावेळी विविध शाळा व महाविद्यालयांतील गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्हे, पारितोषिके आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. विद्यार्थ्यांनी केवळ गुणांच्या स्पर्धेत न अडकता स्वतःच्या कौशल्यांचा विकास करण्यावर भर द्यावा, असा संदेश मान्यवरांनी दिला. मार्गदर्शनपर सत्रात डॉ. नानोटी यांनी विद्यार्थ्यांना जीवनातील संघर्ष स्वीकारून यश मिळविण्याचा मूलमंत्र दिला. भविष्यातील स्पर्धात्मक युगात केवळ पारंपरिक शिक्षण पुरेसे नसून कौशल्याधारित शिक्षण (स्किल बेस्ड लर्निंग) हे यशाचे महत्त्वपूर्ण साधन ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडी आणि क्षमतांचा योग्य मेळ साधत शिक्षणाची दिशा ठरवावी, असे आवाहन त्यांनी केले.

वैज्ञानिक अजिंक्य कोत्तावार यांनी विद्यार्थ्यांना विज्ञान, तंत्रज्ञान आणि इतर विविध क्षेत्रांतील करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन केले. आजच्या बदलत्या शैक्षणिक आणि व्यावसायिक वातावरणात विद्यार्थ्यांनी करिअरसाठी केवळ एकाच पर्यायावर अवलंबून न राहता प्लॅन ए, प्लॅन बी आणि प्लॅन सी असे पर्यायी पर्याय तयार ठेवावेत, असा महत्त्वपूर्ण सल्ला त्यांनी दिला. महापौर सौ.नीता ठाकरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत सकारात्मक विचारसरणी, सातत्यपूर्ण परिश्रम आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर कोणतेही ध्येय गाठता येते, असे सांगितले. विद्यार्थ्यांनी अपयशाला घाबरून न जाता त्यातून शिकत पुढे वाटचाल करावी, असेही त्यांनी नमूद केले. तसेच रँकर्स



हबच्या शैक्षणिक आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि उपस्थित विद्यार्थी व पालकांसाठी मेजवानीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला पालक आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाची प्रस्तावना व्यवस्थापकीय संचालक निखिल मारगमवार यांनी केली. मोहिनी शिवणकर यांनी आभार प्रदर्शन केले. संस्थापक पूनम दीपक निपाने, संचालक डॉ. दीपक निपाने यांच्यासह पारस सर, प्रथमेश सर, पुष्पा शेखावत, कीर्ती मालेवार, प्रणाली मॅम, हर्षल लेंडे आणि प्रतीक गरस्कर यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. रँकर्स हबच्या संपूर्ण चमूच्या अथक प्रयत्नांमुळे हा सोहळा संस्मरणीय ठरला.

थोडक्यात

## सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला आंबेडकरवादी साहित्यिकांचा पाठिंबा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

दिल्लीतील जंतरमंतर येथे दि. २८ जून २०२६ पासून सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक आमरण उपोषण करीत असून आज



त्यांच्या उपोषणाचा २१ वा दिवस आहे. अभिजित दीपके यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या आंदोलनात नीट-२०२६ च्या परीक्षेतील कथित गैरव्यवहारांची निष्पक्ष चौकशी, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी, शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याचे संरक्षण या प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. भारतीय संविधानाने दिलेल्या शांततामय आंदोलनाच्या अधिकाराचा सन्मान राखत शासनाने आंदोलनकर्त्यांशी तातडीने सन्मानपूर्वक संवाद साधावा, सोनम वांगचुक यांच्या प्रकृतीची दखल घ्यावी आणि न्याय्य मागण्यांवर त्वरित कार्यवाही करावी, अशी मागणी आंबेडकरवादी साहित्यिकांनी केली आहे. संविधाननिष्ठ आणि लोकशाही मार्गाने सुरू असलेल्या या आंदोलनाला नैतिक पाठिंबा देणे ही आंबेडकरवादी चळवळीची बांधिलकी असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

या आंदोलनाला - यशवंत मनोहर, सुखदेव थोरात, अर्जुन डांगळे, ज. वि. पवार, ई. झेड. खोब्रागडे, रमेश जनबंधू, प्रमोद वाळके, युवराज सोनटक्के, प्रभंजन चव्हाण, अनमोल शेंडे, मनोहर नाईक, शैलेंद्र लेंडे, जावेद पाशा, प्रकाश मोगले, प्रकाश राठोड, श्याम मुडे, विनायक पवार, प्रसेनजित गायकवाड, ग. ह. राठोड, सर्जनादित्य मनोहर, अनिल सूर्या, ज्योतिक ढाले, महेंद्र ताजणे, हृदय चक्रधर, ग. ह. राठोड, सुरेखा भगत, शिवा इंगोले, सुशील मेश्राम, संजय गोडघाटे, प्रशांत वंजारे, अशोक पळवेकर, सागर जाधव, प्रतिभा अहिरे, सुनीता इंगळे, अशोक कांबळे, प्रमोद नारायणे, संध्या राजूरकर, प्रज्ञाधर ढवळे, राजेंद्र गोणारकर, पद्माकर तामगाडगे, युवराज गंगाराम, संजय जीवने, निशा शेंडे, माधुरी वसंतशोभा, सरिता सातारडे, रमेश राठोड, विजय जाधव, धर्मरक्षित टेंभुर्णे, वसंत शेंडे, अनिल बारसागडे, माणिक गेडाम, अशोक इंगळे, राजानंद सुरडकर, भूषण रामटेके, महेंद्रकुमार मेश्राम, मच्छिंद्र चोरमारे, पवन भगत, विनोद बुरबुरे, प्रकाश दुलेवाले, भीमराव गणवीर, पौर्णिमा मेश्राम आदि आंबेडकरवादी साहित्यिक, विचारवंत, लेखक, कवी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी पाठिंबा दर्शविला आहे.

## बाजारातील मुरूम नमो उद्यानात, नगरपंचायतीत वाद

### मुख्याधिकाऱ्यांनी परस्पर परवानगी दिल्याचा आरोप; नगरसेवकांकडून चौकशीची मागणी



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

नगरपंचायतीच्या आठवडी बाजार परिसरातील ओटे व रस्ते बांधकामादरम्यान उत्खननातून निघालेला मुरूम आणि माती नमो उद्यानाच्या (नमो गार्डन) कामासाठी वापरण्यात आल्याने नगरपंचायतीत वाद निर्माण झाला आहे. याबाबत नगरसेवकांना विश्वासात न घेता मुख्याधिकाऱ्यांनी परस्पर निर्णय घेतल्याचा आरोप करण्यात येत असून, या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी पुढे आली आहे. आठवडी बाजार परिसरात सध्या ओटे व रस्ते बांधकाम सुरू असून त्यासाठी करण्यात आलेल्या उत्खननातून मोठ्या प्रमाणात मुरूम व माती बाहेर पडली. हा मुरूम नगरपंचायतीच्या इतर विकासकामांसाठी, विशेषतः पावसाळ्यात शहरातील खड्डे व चिखलयुक्त भाग भरावासाठी वापरण्याऐवजी सिद्धार्थनगर येथील नमो उद्यानाच्या कामाकडे वळविण्यात आल्याचा आरोप नगरसेवकांनी केला आहे.

पावसाळ्यात शहरातील अनेक भागांत पाणी साचणे, चिखल होणे आणि रस्ते खचण्याच्या तक्रारी असताना उपलब्ध मुरूम शहरातील सार्वजनिक कामांसाठी न वापरता ठेकेदाराला देण्यामागील कारण काय, असा प्रश्न नगरसेवकांनी उपस्थित केला आहे. भविष्यात अशा कामांसाठी नगरपंचायतीला पुन्हा मुरूम खरेदी करावा लागणार असल्याने सार्वजनिक निधीवर अतिरिक्त भार पडू शकतो, असेही त्यांचे म्हणणे आहे. दरम्यान, नमो उद्यानाचे काम करणारे ठेकेदार पालांदूरकर यांनी मुख्याधिकारी गायकवाड आणि बांधकाम अभियंता मयूर वनरासे यांच्या परवानगीनेच बाजार परिसरातील मुरूम व माती नमो उद्यानाच्या कामासाठी वापरल्याचे सांगितले. जेसीबी आणि ट्रॅक्टरच्या साहाय्याने हा मुरूम सिद्धार्थनगर परिसरात नेण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

या व्यवहारात आर्थिक अनियमितता झाल्याचा आरोप काही नगरसेवकांनी केला असून, संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करावी तसेच मुख्याधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीची चौकशी करून आवश्यक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

## माधुरी देशमुख यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

चिटणवीसपुरा महाल नागपूर येथील रहिवासी श्रीमती माधुरी (सुधा) नागेश देशमुख (वय ९४) यांचे १९ जुलै रोजी



अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगी सुरेखा गुप्ते, सुन मृदुल आणि मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर २० जुलै रोजी सकाळी ९.०० वाजता गंगाबाई घाटावर अंतिम संस्कार करण्यात येतील.

# सूफियाना कलाम से गूंज उठा ताजबाग, अल्तमस फरीदी और जुनैद सुल्तानी ने बांधा समां

### हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्ट का आयोजन, देर रात तक झूमते रहे अकीदतमंद

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपुर**

हजरत बाबा ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह के सालाना उर्स के अवसर पर ताजबाग का माहौल उस समय पूरी तरह रूहानियत में डूब गया, जब देश के प्रसिद्ध कव्वाल अल्तमस फरीदी और जुनैद सुल्तानी ने अपनी शानदार सूफियाना कव्वालियों से अकीदतमंदों के दिलों को छू लिया. इश्क-ए-इलाही, मोहब्बत और सूफी परंपरा से सराबोर कलामों ने देर



रात तक समां बांधे रखा.

हर प्रस्तुति पर श्रोता झूम उठे और पूरा परिसर तालियों की गड़गड़ाहट से गूंजता रहा. कार्यक्रम में प्रमुख रूप से विधायक कृपाल तुमाने सहित हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्ट के चेयरमैन प्यारे जिया खान, सचिव ताज अहमद राजा, उपाध्यक्ष डॉ.सुरेंद्र जिचकार, ट्रस्टी हाजी फारूकभाई बावला, हाजी इमरान खान ताजी, गजेंद्रपाल सिंह लोहिया, मुस्तफाभाई टोपीवाला उपस्थित थे.

हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्ट द्वारा आयोजित इस विशेष सूफियाना कव्वाली कार्यक्रम में शहर सहित आसपास के क्षेत्रों से बड़ी संख्या में अकीदतमंद और संगीत प्रेमी शामिल हुए. कार्यक्रम के दौरान कव्वालों ने एक से बढ़कर एक सूफियाना कलाम पेश कर बाबा ताजुद्दीन की शिक्षाओं, इंसानियत, मोहब्बत और भाईचारे का संदेश दिया. कार्यक्रम में मौजूद लोगों ने पूरी तन्मयता से कव्वालियों का आनंद लिया. उर्स के धार्मिक और सांस्कृतिक आयोजनों की श्रृंखला में यह कव्वाली नाइट प्रमुख आकर्षण रही, जिसने देर रात तक श्रद्धालुओं को रूहानी माहौल में बांधे रखा.

हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्ट के पदाधिकारियों ने कार्यक्रम में शामिल सभी अकीदतमंदों, अतिथियों और कलाकारों का आभार व्यक्त करते हुए कहा कि सालाना उर्स के माध्यम से हर वर्ष सूफी परंपरा, अमन, भाईचारे और इंसानियत का संदेश जन-जन तक पहुंचाया जाता रहेगा.

## मोबाईलच्या अतिवापरापासून विद्यार्थ्यांना सावध राहण्याचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

इंडियन मुस्लिम फार्मा फाउंडेशन नागपूरच्या वतीने अंजुमन इंग्लिश प्रायमरी स्कूल, सदर येथे इयत्ता पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी "स्मार्टफोनचा योग्य वापर : मोबाईलचे व्यसन कसे सोडवावे आणि अभ्यासावर लक्ष कसे केंद्रित करावे" या विषयावर एक तासाचे जनजागृती सत्र उत्साहात पार पडले.



या सत्राचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. दिनेश आर. सरोज (डेव्हलपमेंटल अँड बिहेव्हियरल पीडियाट्रिशियन, ऑटिझम अँड चाइल्ड डेव्हलपमेंट सेंटर) यांनी विद्यार्थ्यांना मोबाईलच्या वाढत्या वापरामुळे अभ्यास, वर्तन आणि मानसिक आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांची सविस्तर माहिती दिली. त्यांनी डिजिटल माध्यमांचा संतुलित वापर करण्याचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांना सकारात्मक जीवनशैलीचा संदेश दिला.

सत्रादरम्यान मोबाईलच्या अतिवापरामुळे एकाग्रता कशी कमी होते, स्क्रीन टाइम कमी करण्यासाठी पाच प्रभावी उपाय, अभ्यासाच्या चांगल्या सवयी कशा विकसित कराव्यात याविषयी मार्गदर्शन

### आयएमपीएफ नागपूरतर्फे जनजागृती सत्र संपन्न

करण्यात आले. तसेच विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांशी संवाद साधत त्यांच्या विविध प्रश्नांची उत्तरेही डॉ. सरोज यांनी दिली. या कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. युवा पिढीत आरोग्यदायी डिजिटल सवयी रुजाव्यात आणि मोबाईल व्यसनापासून विद्यार्थ्यांना दूर ठेवण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी क्टढक्र नागपूर यांनी अंजुमन प्रायमरी स्कूल, सदर तसेच डॉ. दिनेश आर. सरोज यांचे आभार मानले.

### फेसबुक पुन्हा सुरू, बिघाड दुरुस्त

**न्यूयॉर्क :** जगभरातील युजर्सना मोठ्या प्रमाणातील आऊटेजचा फटका बसला. कारण, अनेक ठिकाणी फेसबुक डाऊन झाले होते वेबवरून लॉग इन करण्याचा प्रयत्न करणाऱ्या फेसबुक युजर्सना खाते तात्पुरते उपलब्ध नाही असा मेसेज प्राप्त येत होता. मात्र, आता फेसबुकची सेवा पूर्ववत करण्यात आली आहे. डाऊनडिटेक्टरवर आज (१९ जुलै) या सोशल मीडिया क्षेत्रातील दिग्गज कंपनी फेसबुकबाबत समस्या येत असल्याचे नोंदवणा-या युजर्सच्या संख्येत मोठी वाढ झाली. सकाळी साधारण साडेआठ वाजल्यापासून ही समस्या निर्माण झाली होती. अनेकांनी फेसबुक डाऊनबाबत इतर सोशल मीडिया प्लाटफॉर्मवर तक्रारी केल्या होत्या. वेबसाइटबाबत मुख्य समस्या नोंदवली जात होती, तसेच अनेकांना प्लॅटफॉर्मवर लॉग इन करण्यातही अडचण येत होत्या.

## येळाकेळी ते सुकळीबाई आषाढी वारीचे आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, वर्धा**

टेलिकॉम नगर,वर्धा येथील साधना सराफ ताई यांच्या कडून येळाकेळी येथील पंचमुखी हनुमान मंदिर ते सुकळी बाई येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरापर्यंत वारीचे यशस्वी आयोजन करण्यात आले.श्री सयाजी महाराज तसेच श्री मयूर महाराज यांनी वारी ला शुभेच्छा तसेच मार्गदर्शन करून सुरवात करून दिली.अनेक भक्त पंढरपूर ला जाउ शकत नाही. त्यांची इच्छा पूर्ण व्हावी या उद्देशाने प्रेरित होऊन सराफ बंधू भगिनी कडून या वारीचे आयोजन करण्यात आले.

ज्ञानबा-तुकाराम आणि विठ्ठल विठ्ठल या विठू नामाच्या जयघोषात आणि अथांग भक्तीसागरात यंदाचा आषाढी वारी सोहळा दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखील साधना सराफ, सुहासिनी सराफ आणि प्रशांत सराफ याच्या यशस्वी पुढाकारातून पायी वारीचे यंदाचे आयोजन अत्यंत शिस्तबद्ध, स्वच्छ आणि भक्तीमय वातावरणात यशस्वीरित्या संपन्न झाले.

वारीत सहभागी झालेल्या तरुणाईचा आणि विविध क्षेत्रांतील नागरिकांचा सहभाग लक्षणीय होता. वारीच्या वाटेवर दिंड्यांमध्ये चालणारे अभंग, फुगड्या आणि भक्तीमय वातावरणाने संपूर्ण मार्ग दुमदुमून गेला होता. वारी केवळ धार्मिक यात्रा न राहता सामाजिक सलोख्याचे प्रतीक बनली आहे.

महादेवबाबा सेवा समिती पदाधिकारी, तसेच श्रीमती विनाताई, वनितानाई धामदे याचे भजनी मंडळ, सुरेश ठाकरे, पंकज मानलवार परिवार, गायत्री परिवार (इंजि येळणे जी, दत्तू शेंडे, सूर्यवंशी), अमोल माळवे तसेच अनेक भक्ताचा सहभाग होता.तसेच या वारीत टेलिकॉम नगर येथील व साबळे, संजय ढोक, बलखंडे ताई, उगेमुगे ताई, शेंडे ताई व वरभे,वीणा चौधरी प्रा.डॉ. सुधीर अग्रवाल व इतर अनेक माउलींनी सहभाग घेतला. सर्व माऊलींसाठी सुरेख प्रसादाचे आयोजन करण्यात आले.

## डबल इंजिन स्टोअर मॉडेल ठरले यशस्वी

### रवी अग्रवाल यांनी 'कौटुंबिक संसाधनांचे व्यवस्थापन' विषयावर साधला संवाद



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

प्रत्येक शाखेचे व्यवस्थापन कुटुंबातील नेमक्या दोन सदस्यांकडे सोपविणारे 'डबल इंजिन स्टोअर मॉडेल' हेच पुरूषोत्तम सुपर बाजारच्या यशाचे प्रमुख गमक असल्याचे पुरूषोत्तम सुपर बाजारचे संचालक रवी अग्रवाल यांनी सांगितले. विदर्भ मॅनेजमेंट असोसिएशन आयोजित 'कौटुंबिक संसाधनांचे व्यवस्थापन' विषयावरील विशेष सत्रात ते बोलत होते. सत्राचे सूत्रसंचालन सुनील बजाज यांनी केले, तर हरीश पत्रीकर हे सत्राचे मानद यजमान होते.

रवी अग्रवाल यांनी सांगितले की, प्रत्येक शाखेची जबाबदारी दोन कुटुंबीयांमध्ये स्पष्टपणे विभागली जाते. एक सदस्य किराणा, धान्य, तेल आणि पारंपरिक व्यवसाय सांभाळतो, तर दुसरा आधुनिक एफएमसीजी उत्पादने आणि बदलत्या ग्राहकांच्या गरजांनुसार स्टोअर अद्ययावत ठेवण्याची जबाबदारी पार पाडतो. कुटुंबातील महिलाही व्यवसायाच्या विविध जबाबदाऱ्या सक्रियपणे सांभाळत असून, त्यांचे योगदान व्यवसायाच्या वाढीत महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी नमूद केले.

वित्तीय व्यवस्थापन, करप्रणाली, तंत्रज्ञान आणि जीएसटी अनुपालनाची जबाबदारी आता तिसऱ्या पिढीकडे असून, पारंपरिक अनुभव आणि व्यावसायिक व्यवस्थापनाचा उत्तम समन्वय साधला गेला आहे. खरेदी, विक्री, साठा व्यवस्थापन, बँकिंग, कर, विपणन आणि नियोजन अशा सर्व विभागांमध्ये स्पष्ट जबाबदारी वाटप केल्यामुळे व्यवसाय अधिक शिस्तबद्ध झाला आहे.

फ्रँचायझी मॉडेलद्वारे गोंदिया, सावनेर आणि काटोल येथे स्थानिक उद्योजकांनी पुरूषोत्तम सुपर बाजारच्या शाखा सुरू केल्याची माहिती देत त्यांनी ग्राहकांशी वैयक्तिक नाते, दर्जेदार उत्पादने, वाजवी दर आणि प्रामाणिक व्यवहार ही व्यवसायाची प्रमुख बलस्थाने असल्याचे सांगितले.

क्विक कॉमर्स आणि मोठ्या रिटेल प्लॅटफॉर्म्समुळे पारंपरिक किराणा व्यवसायास मोठ्या आव्हानांना सामोरे जावे लागत असून, डिजिटल परिवर्तन, केंद्रीय गोदाम, नवीन उत्पादन श्रेणी आणि पुढील पिढीला नेतृत्वासाठी तयार करणे ही काळाची गरज असल्याचे अग्रवाल यांनी स्पष्ट केले.

आपल्या प्रवासाचा आढावा घेताना त्यांनी सांगितले की, लक्ष्मण यांच्या दूरदृष्टीतून एका छोट्या किराणा दुकानाचे आधुनिक सेल्फ-सर्व्हिस सुपरमार्केटमध्ये रूपांतर झाले आणि संपूर्ण कुटुंबाच्या एकत्रित प्रयत्नांमुळे आज पुरूषोत्तम सुपर बाजार हा विश्वासार्ह ब्रँड म्हणून उभा राहिला आहे.

## २५ जणांनी रक्तदान करून साजरा केला माई ग्रुपचे डॉ. मोतीलाल चौधरी यांचा वाढदिवस

### वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश; ५०० हून अधिक नागरिकांनी घेतला मोफत आरोग्य तपासणीचा लाभ

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

माई फाऊंडेशन व माई ग्रुपचे प्रमुख तसेच आंतरराष्ट्रीय हिंदू परिषद विदर्भचे कार्याध्यक्ष डॉ. मोतीलाल चौधरी यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त बेसा, मनीषनगर येथील राजेश्वर पार्क येथे भव्य रक्तदान शिबिर, वृक्षारोपण तसेच मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले. यावेळी २५ जणांनी रक्तदान करून मानवसेवेचा संदेश दिला, तर सुमारे ५०० नागरिकांनी विविध आरोग्य सेवांचा लाभ घेतला.

डॉ. मोतीलाल चौधरी हे अनेक वर्षांपासून आपला वाढदिवस सामाजिक उपक्रमांद्वारे साजरा करत आहेत. वयाच्या १९व्या वर्षापासून ते प्रत्येक वाढदिवशी नियमित रक्तदान करत असून गरजूंना मदत करण्यासाठी विविध सामाजिक उपक्रम राबवत आहेत. यंदाही त्यांनी सर्वप्रथम स्वतः रक्तदान करून उपस्थितांना रक्तदानासाठी प्रेरित केले.

कार्यक्रमादरम्यान जांभूळ, आंबा, बोर, चिकू आदी विविध फळझाडांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. तसेच नागरिकांसाठी रक्तदाब, मधुमेह, दंत तपासणी, नेत्र तपासणी, होमिओपॅथिक उपचार, मोफत चष्मा वाटप आणि सात दिवसांसाठी मोफत होमिओपॅथिक औषधांचे वितरण करण्यात आले. नेत्र तपासणी शिबिरात ११२ हून अधिक गरजू नागरिकांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला माई फाऊंडेशनच्या सचिव रुबी चौधरी, आंतरराष्ट्रीय हिंदू परिषदचे प्रांतमंत्री योगेश गायकवाड, राष्ट्रीय बजरंग दलाचे प्रांत महामंत्री यजेंद्रसिंह ठाकूर, पवार कृती समितीचे अध्यक्ष पृथ्वीराज रहांगडाले, डॉ. रामचंद्र दुबे, बेसा-पिपळा नगर परिषदेचे बांधकाम सभापती मुकेश काळे तसेच फॉर्च्यून असोसिएशनचे सचिव सुनील यारावार प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

यावेळी अखिल भारतीय भोयर पवार महासंघाचे अध्यक्ष डॉ. एन. डी. राऊत, राष्ट्रीय लेबर युनियनचे अध्यक्ष विजय पाटले, प्रा. सुरेंद्र मोर यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते व



मान्यवरांनी उपस्थित राहून डॉ. चौधरी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना डॉ. मोतीलाल चौधरी म्हणाले, "रक्तदान हे महादान आहे. एखाद्या गरजू रुग्णाला वेळेवर रक्त मिळाल्यानंतरच रक्तदानाचे खरे महत्त्व लक्षात येते. प्रत्येक निरोगी व्यक्तीने नियमित रक्तदान करावे."

शिबिरात आयुष ब्लड बँकेचे डॉ. संजय बारागवणे, होमिओपॅथिक तज्ज्ञ डॉ. पूजा तुरकर (पाटले), दंततज्ज्ञ डॉ. वृंदा कॉलरकर तसेच स्व. भानुताई गडकरी संस्थेच्या नेत्रतज्ज्ञांनी सेवा दिली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नीलेश बोपचे, शिवा पारधी, सुरेश टेंभरे, उमेश महंत, विलास डिग्रेस, राहुल क्षीरसागर, हीरालाल पराडकर, श्रीपाद दखने, राजेश तेजकर, शिरीष पाठक, जैलाल पाटले, पूनम नले, प्रदीप नले, सूर्यकांत राजे, सुभाष पाटले, श्रीकृष्ण तळेगावकर, श्रीहरी चौधरी, मोतीलाल पाटले, संजय ठाकरे, रिया रामटेके, मल्हार, प्रद्योत पाटले, अथर्व चौधरी, प्रसन्या चौधरी, हर्षाली सेलोटी, राहुल तसेच मोहन गोरे यांच्यासह सर्व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# महायुतीत अर्थखात्यावरून वाद ?

**वृत्तसंस्था, जळगाव**

राज्याचे ग्रामविकास व जलसंधारण मंत्री गिरीश महाजन यांनी विविध राजकीय, सामाजिक आणि शेतकरी प्रश्नांवर भाष्य करताना सरकारच्या भूमिकेची माहिती दिली. लाडक्या बहिणींना रेशन दुकानांमार्फत साड्यांचे वाटप बंद करण्यापासून ते महिलांसाठी नव्या रोजगाराभिमुख योजनेची घोषणा, महायुतीतील समन्वय, पावसाअभावी निर्माण झालेली शेतकऱ्यांची बिकट परिस्थिती तसेच विरोधकांवर टीका अशा अनेक मुद्यांवर त्यांनी प्रतिक्रिया दिली.



लाडक्या बहिणींना साड्या मिळणे बंद झाल्याबाबत बोलताना मंत्री महाजन म्हणाले की, सरकारकडे पैसे नाहीत म्हणून हा निर्णय घेतलेला नाही. रेशन दुकानांमधून साड्यांचे वाटप करताना अनेक व्यावहारिक अडचणी निर्माण होत होत्या. त्यामुळे आता महिलांना दीर्घकालीन फायदा होईल, रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील आणि त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील, अशी नवीन योजना सरकार राबविण्याचा विचार करत आहे. या योजनेवर खर्च अधिक आला तरी हरकत नाही, मात्र महिलांना कायमस्वरूपी लाभ मिळणे महत्त्वाचे आहे.

**दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याबाबत माहिती नाही**

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र येऊन त्यानंतर एनडीएमध्ये सहभागी होण्याच्या चर्चेबाबत विचारले असता महाजन म्हणाले की, याबाबत मला कोणतीही माहिती नाही. अशा चर्चांमध्ये मी सहभागी नाही. या विषयावर मुख्यमंत्री, पक्षाध्यक्ष आणि केंद्रीय नेतृत्व स्तरावर चर्चा होत असेल.

**केंद्रीय मंत्रिमंडळात शिवसेनेच्या मागणीवर प्रतिक्रिया**

शिवसेनेकडून केंद्रात तीन मंत्रिपदांची मागणी करण्यात आल्याच्या चर्चेवर ते म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे थेट केंद्रीय नेतृत्वाशी संबंध आहेत. ते अमित शहा किंवा भाजपच्या राष्ट्रीय नेतृत्वाशी चर्चा करत असतील. याबाबत अधिक माहिती त्यांनाच असेल.

**महायुतीत अर्थखात्यावर कोणताही वाद नाही**

महायुतीमध्ये अर्थखात्याच्या वाटपावरून मतभेद असल्याच्या चर्चेचे त्यांनी खंडन केले. अर्थखात्यावरून कोणताही वाद नाही. हा निर्णय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि एकनाथ शिंदे यांच्या चर्चेनंतर होईल. मी स्वतः या संदर्भात कोणतीही माहिती ऐकलेली नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

**प्रफुल्ल पटेल प्रकरण राष्ट्रवादीचा अंतर्गत विषय**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल नाराज असल्याच्या चर्चेवर महाजन म्हणाले, हा अजित पवार गटाचा अंतर्गत पक्षीय विषय आहे. त्यावर भाष्य करणे योग्य ठरणार नाही.

# ३ दिवसांत अहवाल देण्याचा आदेश

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

गेल्या ३ आठवड्यांपासून बेमुदत उपोषण करत असलेल्या सोनम वांगचुक यांच्या पत्नीने दिल्ली उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका फेटाळण्यात आली. सोनम वांगचुक यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्याची मागणी याचिकेच्या माध्यमातून करण्यात आली होती. न्यायालयाने त्यांना दिलासा देण्यास नकार दिला. वांगचुक यांची ढासळती प्रकृती पाहता त्यांना रुग्णालयात नेण्याचा निर्णय योग्य होता, असे उच्च न्यायालयाने म्हटले.

उपचारांबद्दलचे सगळे वैद्यकीय निर्णय डॉक्टरांचे पथक सोनम वांगचुक यांच्या सहमतीने घेतील, असे दिल्ली उच्च न्यायालयाने स्पष्ट केले. सफदरजंग




रुग्णालयात वांगचुक यांच्यावर उपचार सुरू राहतील आणि एम्सचे डॉक्टरदेखील त्यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवतील, असे न्यायालयाने म्हटले आहे. या प्रकरणी केंद्र सरकार, दिल्ली पोलिस आणि रुग्णालय यांच्याकडून उच्च न्यायालयाने ३ दिवसांत अहवाल मागवला आहे. या प्रकरणी पुढील सुनावणी २४ जुलैला होणार आहे.

शरीराची वैद्यकीय स्थिती प्रत्येक वेळी सारखी नसते. त्यामुळे अशा प्रकरणांत न्यायालयाला संपूर्ण घटनाक्रमावर लक्ष ठेवावे लागते. वांगचुक यांची प्रकृती बिघडल्याने सरकारने त्यांना रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय गरज पाहता हा निर्णय योग्य होता, असे न्यायालयाने म्हटले. सोनम वांगचुक कोणत्याही प्रकारच्या अटकेत नाहीत. त्यांच्या कुटुंबियांना रुग्णालयात जाऊन भेटण्याची परवानगी आहे. उपचारा दरम्यान पुढे घेतले जाणारे वैद्यकीय निर्णय डॉक्टरांच्या सहमतीने घेतले जातील, ही बाब न्यायालयाने स्पष्ट केली.

**पत्नीची मागणी केली अमान्य**

सोनम वांगचुक यांच्या पत्नीच्या वतीने वरिष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी बाजू मांडली. सोनम वांगचुक यांना सफदरजंग रुग्णालयातून खासगी रुग्णालयात हलवण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी सिब्बल यांनी केली. वांगचुक यांना त्यांच्या डॉक्टरांना आणि वकिलांना पूर्णपणे भेटायला मिळत नाही. रुग्णाला त्याच्या गरजेनुसार पसंतीच्या रुग्णालयात उपचार घेण्याचा अधिकार आहे, असा युक्तिवाद सिब्बल यांनी केला. मात्र, न्यायालयाने तो फेटाळून लावला.

# इराणवर अमेरिकेचा क्षेपणास्त्रांचा पाऊस



**वृत्तसंस्था, जॉर्डन**

इराणने जॉर्डनमध्ये अमेरिकेच्या लष्करी तळावर भीषण हल्ला केला असून यात दोन अमेरिकन सैनिक ठार, तर चार सैनिक गंभीर जखमी झाले आहेत. इराणच्या थेट हल्ल्यात प्रथमच अमेरिकेच्या सैनिकांचा मृत्यू झाला आहे. यामुळे अमेरिकेची चांगलीच सटकली असून अमेरिकन लष्कराने इराणमधील विविध ठिकाणांवर क्षेपणास्त्रांचा अक्षरशः पाऊस पाडला आहे. अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर इराणवरील कारवाईची माहिती दिली आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या निर्देशानुसार, आज संध्याकाळी ठीक ६ वाजता अमेरिकन सैन्याने इराणवर नवीन हवाई हल्ले सुरू केले आहेत. होर्मुझच्या सामुद्रधुनीत व्यावसायिक जहाजांना असलेला इराणचा धोका मोडून काढणे आणि जॉर्डनमध्ये अमेरिकन सैनिकांवर हल्ला करणाऱ्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सला तात्काळ शिक्षा देणे, हा या हल्ल्यांचा उद्देश आहे असे सेंट्रल कमांड आपल्या निवेदनात म्हटले आहे.

**जॉर्डनमधील हल्ल्याचा घेतला बदला**

या कारवाईमुळे अमेरिका आणि इराणमधील संघर्ष आणखी वाढला असून आखातात युद्धाचे काळे ढग जमा होऊ लागले आहेत. शुक्रवारी इराणकडून जॉर्डनमधील मुवाफक साल्टी एअर बेसवर भीषण बॅलिस्टिक क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ला करण्यात आला होता. या तळावर अमेरिकन आणि त्यांचे मित्रराष्ट्र दल तैनात होते. या हल्ल्यात अमेरिकेचे दोन सैनिक ठारे झाले, तर एक सैनिक अद्याप बेपत्ता आहे. इतर चार जखमी सैनिकांना जॉर्डनमधील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र त्यांना आता डिस्चार्ज मिळाला आहे. किरकोळ जखमी झालेले इतर सैनिक पुन्हा कर्तव्यावर हजर झाले आहेत.

**अमेरिकेने गमावले १६ सैनिक**

इराणसोबतच्या थेट संघर्षात जीव गमावलेल्या अमेरिकन सैनिकांची संख्या आता १६ वर पोहोचली आहे. दरम्यान, अमेरिकन लष्कराने सुरक्षेच्या कारणास्तव इराणमधील नेमक्या कोणत्या ठिकाणांना लक्ष्य केले आहे, याची माहिती अद्याप उघड केलेली नाही. तसेच या हल्ल्यात इराणचे किती नुकसान झाले याचा प्राथमिक अंदाज अद्याप जाहीर करण्यात आलेला नाही.

# शंकाचे निरासन होताच स्मार्ट मीटर बसविण्यास ग्राहकांची पसंती

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

डिजिटल युगाच्या दिशेने वाटचाल करताना वीज क्षेत्रात सुरू असलेल्या तांत्रिक बदलांचा स्वीकार करण्यास नागपूर आणि वर्धा जिल्ह्यांतील ग्राहकांनी आता मनापासून सुरुवात केली आहे. स्मार्ट मीटरबाबत समाजात पसरलेल्या काही गैरसमजांना आणि अफवांना छेद देत, महावितरणने राबवलेल्या व्यापक संवाद मोहिमेला ग्राहकांचा उत्स्फूर्त आणि सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. या मोहिमेच्या माध्यमातून केवळ आठवड्याभरात ६ हजारांहून अधिक ग्राहकांनी स्वतःहून पुढाकार घेऊन आपल्या घरांमध्ये स्मार्ट मीटर बसवून घेतले आहे, ही बाब वीज क्षेत्रातील या बदलांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.



महावितरणच्या नागपूर परिमंडलात स्मार्ट मीटरच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी पुढाकार घेतला होता. त्यांनी आपल्या सर्व अधिकारी आणि कर्मचारी वर्गाला ग्राहकांच्या शंकांचे पूर्णपणे निरासन करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या होत्या. याच धर्तीवर ८ जुलैपासून परिमंडलात एका विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले. नागपूर ग्रामीणचे अधीक्षक अभियंता संजय वाकडे, नागपूर शहरचे अधीक्षक अभियंता प्रफुल्ल लांडे आणि वर्धाच्या अधीक्षक अभियंता स्मिता पारखी यांच्यासह सर्व कार्यकारी अभियंते, अतिरिक्त कार्यकारी अभियंते, उपकार्यकारी अभियंते आणि कर्मचाऱ्यांनी ग्राहकांशी संवाद साधण्यासाठी एकाच दिवशी तब्बल २०० ठिकाणी बैठका आणि शिबिरे आयोजित केली. या शिबिरांचा मुख्य उद्देश ग्राहकांच्या मनात असलेली भीती घालवून त्यांना स्मार्ट मीटरचे फायदे पटवून देणे हा होता.

या शिबिरांमध्ये महावितरणच्या अधिकाऱ्यांनी स्मार्ट मीटर हे ग्राहकांच्या आणि महावितरणच्या हिताचे कसे आहे, हे सविस्तर स्पष्ट केले. स्मार्ट मीटरमुळे मानवी हस्तक्षेप कमी होऊन बिलामध्ये पूर्णपणे पारदर्शकता येईल, तसेच ग्राहकांना आपल्या दैनंदिन वीज वापराची माहिती अधिक अचूकपणे मिळेल, असे पटवून देण्यात आले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, स्मार्ट मीटर धारकांना टीओडी म्हणजेच टाइम ऑफ डे सवलतीचा लाभ मिळणार असून, त्यानुसार त्यांना प्रति युनिट ८५ पैशांपर्यंतची बचत करता येणार आहे, ही बाब ग्राहकांसाठी मोठी दिलासादायक ठरली.

याशिवाय, भविष्यात वीज बिलासंदर्भात काही तक्रार असल्यास ती तात्काळ सोडवली जाईल आणि स्थानिक उपविभागीय स्तरावरच सर्व तांत्रिक अडचणींचे निरासन केले जाईल, अशी ठोस हमी महावितरणने ग्राहकांना दिली आहे.

महावितरणच्या या पारदर्शक आणि संवादशील भूमिकेमुळे ग्राहकांचा विश्वास वाढला असून, जे ग्राहक सुरुवातीला स्मार्ट मीटरला विरोध करत होते, त्यांनी आता स्वेच्छेने मीटर बसवण्यास संमती दिली आहे. या सकारात्मक बदलामुळे गेल्या आठवड्याभरात तब्बल ६ हजार ५५ ग्राहकांच्या घरी स्मार्ट मीटर बसवण्याचे काम यशस्वीपणे पूर्ण झाले आहे. यासह आता परिमंडलातील एकूण स्मार्ट मीटरची संख्या ७ लाख ५९ हजार ५७ वर पोहोचली आहे. यामध्ये नागपूर जिल्ह्यातील ६ लाख ८ हजार ४४६ तर वर्धा जिल्ह्यातील १ लाख ५१ हजार २६३ ग्राहकांचा समावेश आहे. उर्वरित ग्राहकांच्या घरीही टप्प्याटप्प्याने स्मार्ट मीटर बसवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून, नागपूर परिमंडल डिजिटल वीज वितरण व्यवस्थेकडे वेगाने वाटचाल करत आहे. ग्राहकांचा हा वाढता पाठिंबा भविष्यातील स्मार्ट ग्रिडच्या स्वप्नाला बळ देणारा ठरत असून ग्राहकांच्या शंकांचे निरसन करण्यास महावितरण सदैव कटिबद्ध असल्याची ग्वाही मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी दिली आहे.

## मंत्री गिरीश महाजन यांचे बनावट एआय फोटो व्हायरल करणारा गजाआड

**मुंबई :** राज्याचे मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते गिरीश महाजन यांचे एका मुलीसोबतचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने राजकीय वतुर्ळात मोठी खळबळ उडाली होती. आता हे बनावट फोटो व्हायरल करणाऱ्या मुख्य संशयित आरोपीला अटक करण्यात सायबर पोलिसांना मोठे यश आले आहे. आरोपीने कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात 'एआय' तंत्रज्ञानाचा वापर करून हे खोटे फोटो तयार केल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी सायबर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे माग काढत संशयित आरोपी बालाजी म्हस्के याला पुणे जिल्ह्यातील इंदापूर येथून शिताफीने ताब्यात घेतले .

# ग्रामीण रुग्णालय सालेकसा येथील रुग्णसेवा प्रश्नचिन्हाखाली

## डॉक्टर-परिचारिकांच्या वर्तणुकीबाबत संताप, चौकशीची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा- राजू फुंडे**

सालेकसा तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयातील आरोग्य सेवा, रुग्णांशी होणारी वागणूक आणि कर्मचाऱ्यांच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. अतिदुर्गम व नक्षलग्रस्त भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सालेकसा तालुक्यात दर्जेदार आरोग्य सेवा मिळणे ही नागरिकांची मूलभूत अपेक्षा असताना, प्रत्यक्षात अनेक रुग्णांना निष्काळजीपणा व उद्धट वागणुकीचा सामना करावा लागत असल्याचा आरोप होत आहे.

मौजा गिरोला येथील रहिवासी शिदुबाई महेंद्र हुकरे या जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा, गिरोला येथे शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत स्वयंपाकी म्हणून कार्यरत आहेत. त्यांना शासनाकडून मानधन मिळते. शाळेत वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असल्याने त्या ग्रामीण रुग्णालय, सालेकसा येथे गेल्या होत्या.

यावेळी त्यांना सलाईन लावण्याचा सल्ला देण्यात आला. प्रथम एका हातात सलाईन लावण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र ती व्यवस्थित न लागल्याने दुसऱ्या हातात सलाईन लावण्यात आली. त्यानंतर पहिल्या हातात तीव्र वेदना सुरू झाल्याने त्यांच्या पतीने परिचारिकेकडे याबाबत विचारणा केली. मात्र, त्यांना समाधानकारक उत्तर देण्याऐवजी, "तुम्ही गप्प बसा,




आम्ही आमचे काम करत आहोत, बाहेर जा," अशा स्वरूपाची उद्धट वागणूक मिळाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांशी सहानुभूतीने संवाद साधण्याऐवजी त्यांना दमदाटी केली जात असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. सरकारी रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या गरीब व सर्वसामान्य नागरिकांना सन्मानाची वागणूक मिळणे अपेक्षित असताना अशा प्रकारच्या घटना अत्यंत गंभीर असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

अतिदुर्गम आणि नक्षलग्रस्त भागातील नागरिकांना खासगी उपचार परवडत नसल्याने ग्रामीण रुग्णालयावरच अवलंबून राहावे लागते. त्यामुळे डॉक्टर, परिचारिका व संबंधित कर्मचाऱ्यांनी रुग्णांशी संवेदनशीलतेने वागून दर्जेदार सेवा देणे आवश्यक आहे. संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

**थोडक्यात**

## दिवंगत मयुरी राष्ट्रपाल मानवटकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ ५,००० चे धम्मदान अनागरिक, बुद्ध विहार येथे दान

**दै. सिंहवाणी वृत्त, महादुला**

स्थानिक अनागारिक धम्मपाल बौद्ध विहार, झेंडा चौक, महादुला येथील विहाराच्या विकास व धार्मिक, सामाजिक कायासाठी दिवंगत मयुरी राष्ट्रपाल मानवटकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे लहान भाऊ सुहास राष्ट्रपाल मानवटकर व मानवटकर परिवाराकडून ५,००० (अक्षरी पाच हजार रुपये) इतके धम्मदान देण्यात आले. विहाराच्या विविध विकासकामांना तसेच सामाजिक व धार्मिक उपक्रमांना चालना मिळावी, या उदात्त हेतूने हे धम्मदान देण्यात आल्याचे सांगण्यात आले.

मानवटकर परिवाराच्या या दातृत्वाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. या उदार योगदानाबद्दल अनागारिक धम्मपाल बौद्ध विहार समिती, महादुला यांच्या वतीने सुहास मानवटकर व समस्त मानवटकर परिवाराचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. तसेच दिवंगत मयुरी राष्ट्रपाल मानवटकर यांना समितीतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तसेच महादुला गावातील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते चंद्रमणी बनसोड यांच्या स्मृतिदिवसानिमित्त देखील त्यांचा मुलगा सुमित बनसोड याने आज विहार समितीला १००००रुपयाचे धम्म निधी दिला विहाराचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच उपासक-उपासिका यांनी बनसोड आणि मानवतकर कुटुंबांचे आभार मानले. कार्यक्रमाला अनागरिक बुद्धविहार समितीचे सर्व सदस्य उपाशिका उपासकांनी त्यांचे आभार मानून हा निधी गरीब जातीतील मुलांसाठी खर्ची करण्यात येईल असे सांगितले.

## आर्यारवी एंटरटेनमेंटच्या पुरस्कार वितरण सोहळ्यात डॉ. महेश अभ्यंकर, रामजित(जितू) गुप्ता, अरविंद सुर्वे, दिलीप नारकर 'जनसेवा रक्षक' पुरस्काराने सन्मानित




**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई -गुरुनाथ तिरपणकर**

पत्रकारिता, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात आर्यारवी एंटरटेनमेंट संस्था गेली १०वर्षे कार्यरत आहे. संस्थेचे अध्यक्ष लेखक-दिग्दर्शक,सिने-नाट्य अभिनेते, पत्रकार महेश्वर तेटांबे यांनी नुकताच दादर येथे आर्यारवी एंटरटेनमेंटच्या माध्यमातून पहिला पत्रकार, मुक्त पत्रकार, संपादक,कला, साहित्य,समाजसेवक पुरस्कार वितरण सोहळा आयोजित केला होता.यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.त्याच अनुषंगाने महाराष्ट्रातील सर्व सामान्यांना सढळ हस्ते मदत करणारे अँन्टीपायरी सेलचे मुख्य तपासी अधिकारी रामजित (जितू) गुप्ता,उषा हॉस्पिटलीटीचे संचालक, परोपकारी व्यक्तीमत्व समाजसेवक अरविंद सुर्वे, आंतरराष्ट्रीय कीतीर्चे व्याख्याते, समुपदेशक,लेखक डॉ.महेश अभ्यंकर, सिटीझन वेल्फेअर असोसिएशन संस्थापक सदस्य, महाराष्ट्र साहित्य समता परिषदेचे अध्यक्ष, राष्ट्रपती पदक सन्मानित दिलीप नारकर यांना जीवन सेवा रक्षक पुरस्काराने प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करुन सन्मानित करण्यात आले.

तसेच रामजित (जितू) गुप्ता, अरविंद सुर्वे, दिलीप नारकर, डॉ.महेश अभ्यंकर ही हरहुन्नरी,समाज उपयोगी जेष्ठ-श्रेष्ठ व्यक्तीमत्वे सामाजिक क्षेत्रात अग्रगण्य कार्यरत असलेल्या जनजागृती सेवा संस्थेच्या जेष्ठ सल्लागारपदी कार्यरत आहेत.यांना हा जनसेवा रक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

## सर्वपक्षीय बैठकीत विरोधकांचा बहिष्कार

**नवी दिल्ली :** संसदेच्या पावसाळी अधिवेशनापूर्वी केंद्र सरकारने रविवारी बोलावलेल्या सर्वपक्षीय बैठकीत विरोधी पक्षांनी काही काळासाठी प्रतीकात्मक वॉकआऊट करून निषेध नोंदवला. तृणमूल काँग्रेसच्या बंडखोर खासदारांचा समावेश असलेल्या नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी ऑफ इंडिया (एनसीपीआय) या पक्षाला बैठकीचे निमंत्रण दिल्याच्या निर्णयाविरोधात हा निषेध करण्यात आला. काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत सर्व विरोधी पक्षांनी काही मिनिटांसाठी बैठकीतून बाहेर पडत सरकारच्या निर्णयाचा निषेध केल्याचे सांगितले. लोकसभा अध्यक्षांकडे या २० कथित बंडखोर खासदारांबाबत अंतिम निर्णय प्रलंबित असताना त्यांना स्वतंत्र गट म्हणून निमंत्रण देण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोइत्रा यांनी सांगितले की, काँग्रेस, समाजवादी पक्ष, डीएमके, झारखंड मुक्ती मोर्चा, आम आदमी पक्ष, नॅशनल कॉन्फरन्स, डावे पक्ष आणि शिवसेना यांच्यासह सर्व विरोधी पक्षांनी या निर्णयाविरोधात सर्वपक्षीय बैठकीवर बहिष्कार घातला आहे.

अधिकृत यादीत तृणमूल काँग्रेसची खासदार संख्या २८ असल्याचे नमूद असतानाही मान्यता नसलेल्या एनसीपीआयला स्वतंत्र स्थान देण्यात आल्याचा त्यांनी आक्षेप घेतला. महुआ मोइत्रा यांनी सांगितले की, या २० कथित बंडखोर खासदारांच्या विलीनीकरणाला लोकसभा अध्यक्षांची अद्याप मान्यता मिळालेली नाही. त्यांच्याविरोधातील अपात्रतेच्या २० याचिका अद्याप प्रलंबित आहेत. ९१ व्या घटनादुरुस्तीनंतर स्वतंत्र गटाला मान्यता देण्याची तरतूद नसताना संसदीय कामकाज मंत्र्यांनी त्यांना कोणत्या आधारावर निमंत्रण दिले असा सवालही त्यांनी उपस्थित केला. शिवसेना खासदार अरविंद सावंत यांनीही या मुद्यावर सरकारवर टीका केली. शिवसेनेच्या सहा खासदारांचे एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत विलीनीकरण मान्य करण्याच्या लोकसभा अध्यक्षांच्या निर्णयालाही त्यांनी विरोध दर्शवला.